श्री साईनाथ प्रसन्न

श्री साईलीला

मासिक

वर्ष १९] जानेवारी, फेब्रुवारी, मार्च १९४२ [अंक १-२-३

1942

बाबा बाबा, निशिदिनि मना बोल रे बोल बाबा ॥
बाबा नामीं कितितरी असे दिव्य जादू अबाबा ॥

बा बाल्यिचें त्यज शरण जा त्या न भूपा नबाबा ॥
बा बाधा ना, तुझ यमगृहीं जाबयाची जबाबा ॥

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ॥
क्षणमपि सज्जनसंगतिरेका भवति भवार्णवतरणे नौका ॥ १ ॥

१९-३-४२

—शंकराचार्य

संपादकः—रामचंद्र वासुदेव बेसास

अनुक्रमणिका

	विषय	पृष्ठें
१	संपादकीय	६० ते ७५
२	श्री साईगाथामृत	७६ ते ८८
	,, प्रकरण ७	
३	श्री रामजयंती उत्सवाचा कार्यक्रम	४१२
४	प्रोटेस्ट	४१४
५	अनाउन्समेंट	४१५
६	शिरडी वृत्त	४१६ ते ४१९

श्री साईभक्तांस विनंती

साईलीलेचें वर्ष जानेवारी महिन्यापासून सुरू होते. तरी अंक सुरू करणें झाल्यास जानेवारीपासून वर्गणीदार झालें पाहिजे. नवीन वर्गणीदारानी वार्षिक वर्गणी २-४-० रुपये मनिऑर्डरने पाठवावी.

भक्तांनी आपले अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां कृपा करून खालील पत्त्यावर पाठवावेत. आपलें नांव प्रसिद्ध होणें नको असेल त्यांनी आपलें टोपण नांव व आपला पत्ता कळवावा म्हणजे तशी व्यवस्था होईल.

पुष्कळ भक्तमंडळींच्या पत्त्यांत फेरफार झाल्यामुळें त्याना पोस्टांतून पाठविलेल्या उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका व प्रसाद न पोंहचतां परत येतात. तरी कृपा करून त्यांनी आपले पत्ते बदलले असल्यास ऑ. चिटणीस रा. रा. श्री. ना. खारकर, ३७ चरई रोड, ठाणे यांजकडे तसें कळवावें.

संम्पादक, **श्रीसाईलीला**

लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नं. २

गोखले रोड नॉर्थ, दादर, मुंबई नं. १४

गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ॥
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्रधिम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष १९ अंक १-२-३
शके १८६३-६४) श्रीसद्गुरु साईनाथ माघ-फाल्गुन-चैत्र

संपादकीय

शिर्डी संस्थानचा कारभार एप्रील ते मार्च किंवा चैत्र ते फाल्गुन असा चालत असे पण संस्थान कमिटीनें गेल्या वर्षापासून म्हणजे सन १९४१ पासून संस्थानचा कारभार जानेवारी ते डिसेंबर असा चालू केला आहे. अर्थात त्यांच्याच आश्रयानें चालू असलेल्या साईलीलेचें सुद्धां वर्ष बदललें आहे.

साईलीलेचें अठरावें वर्ष एप्रील ते डिसेंबर असें दहा महिन्यांतच संपवावें लागले. म्हणून ज्या साईलीलेच्या वर्गणीदारांकडून १९४२ सालची वर्गणी येणें आहे त्यांजकडे १९ व्या वर्षाचा जोड अंक पाठवीत आहों. व ज्या वर्गणीदारांकडून नवे व जुने शके १८६३ (इ. स. १९४१-४२) ची वर्गणी २-४-० आली आहे, त्यांजकडे चालू सालची जानेवारी ते मार्च या जोड अंकाची किंमत आणे ८८ कमी घेतली जाईल. तरी अंक पोंचतांच १९४२ सालची वर्गणी २-४-० मनिऑर्डरनें पाठवावी.

या वर्षी वर्गणीदारांनी आपणांबरोबर आणखी एक एक वर्गणीदार वाढवून द्यावा अशी विनंती आहे असें जमल्यास साईलीला दरमहा प्रसिद्ध करण्याचा विचार आहे.

श्री साईलीला मासिक अधिक लोकप्रिय व सर्वसाधारण श्रद्धालु आबाल वृद्धांना वाचनीय व्हावें, व त्यांतील मजकुरांत विविधता, मनोवेधकता, आणि उपयुक्तता निर्माण व्हावी व वाचकांना सुख, संपत्ती, आणि समाधान यांचा लाभ व्हावा या हेतूनें मुंबई येथील सेंट रामदास मिशनचे कार्यकर्ते साईभक्त महाराज श्री. योगेंद्रनाथ बाळकृष्ण यांनीं श्री. सौ. इंदिरा गाडगीळ, श्री. कु. कुमुदिनी खेर, श्री. कुमारी लीलावती गोविंदराव बोले, श्री. नाथ निफाडकर, श्री. पां. तु. कांदळगांवकर, व इतरा त्यांच्या परिचयाचे सात्त्विक साहित्यसेवकांस याकामीं सहकार्य करण्यासंबंधीं विनंती केली आहे. त्यांच्या विनंतीनुसार ज्यांचे साहित्य आम्हाकडे प्रसिद्धीसाठीं येईल त्यांना आम्हीं प्रसिद्धी देण्याचें योजिलें आहे. पैकीं पुढील अंकीं

नवनाथ सांप्रदाय आणि श्री साईनाथांचें कार्य

हा श्री. महाराज योगेंद्रनाथ बाळकृष्ण यांच्या तडफदार लेखणींतून बाहेर पडलेला लेख प्रसिद्ध करण्यांत येईल.

—संपादक

माझी पारख अशीच कां केलीस ? बाबा म्हणजे हा ओट हाताचा देह दिसतो तेवढाच का ? अरे मी मुंगी, माशी किंवा दुसरें वाटेल तें रूप धारण करून खातों, मी तुझी पोळी माशीच्या रूपानें केव्हांच खाल्लीं आहे, तूं आतां जा आणि जेवण कर; इतक्यानें नानाची समजूत पटेना तेव्हां बाबांनीं त्यांना कांहीं सांकेतिक खूण करून ही गोष्ट पटविली आणि ' सर्वांभूतीं भगवद्भावांचा धडा शिकविला.

' भूतीं सदैव पहावा भगवन्त '

हा धडा बाबांनीं श्री. रामचंद्र आत्माराम तर्खड यांच्या प्रेमळ पत्नीला शिकविला, याची कथा श्रीसांईसच्चरिताच्या नवव्या अध्यायांत आलेली आहे. ती येथें थोडक्यांत देतों. ही माई शिरडीस एकदां पानावर जेवावयास बसली असतां एक भुकेलेलें श्वान तेथें येऊन ओरडूं लागलें. लगेच त्या माईनीं आपल्या पानावरील चतकुर भाकर त्या कुत्र्याला घातली. ही गोष्ट तिच्या ध्यानींमनींहि नव्हती. दुपारीं नित्यक्रमानुसार ती मशीदींत दूर बसली असतां बाबा तिला सादर पुसूं लागले कीं " आई त्वां आज मज जेऊं घातलें । तेणें हें आकंठ पोट भरलें ॥ होते हे प्राण व्याकुळ झाले । ते तृप्त केले गे तुवां ॥ १२० ॥ ऐसेंच करीत जावें नित्य । हेंच कामीं येईल सत्य ॥ मशीदींत बैसून मी असत्य । बोलेन हें त्रिसत्य घडेना ॥ १२१ ॥ अशीच माझी दया जाणावी । भुकेल्या भाकर आधीं द्यावी ॥ आपुल्या पोटानंतर खावी । धरावें जीवीं हें नीट ॥ १२२ ॥ " साईसमर्थ असे हे काय बोलतात याचा अर्थ त्या माईला कळेना. बाबाची वाणी तर अमोघ, तेव्हां ते बोलतात याचा काय भावार्थ असेल बरें ? खुलासा करून घेण्यासाठीं ती त्याना म्हणाली—बाबा, मी तुम्हाला जेवूं घालीन हें शक्य तरी आहे कां ? मीच येथें परतंत्र असून मिळेल तेथें व तसें खाते. तेव्हां बाबा प्रत्युत्तर करितात—' सेवूनियां ती प्रेमाची भाकर । जाहलों मी तृप्ति निर्भर । अजून मजला येती ढेंकर ॥ १२५ ॥ तूं जेऊं बैसतां द्वारी येतां । पोटीं क्षुधेची जया व्याकुलता । त्वां देखिलें ज्या श्वाना अवचितां । **मज एकात्मता तयां सर्वें** ॥ १२६ ॥ हें बाबाचें वचन ऐकून तिला विस्मयानंद झाला आणि श्वानें, सुकरें, मांजरें जीं वावरतात तीं समस्त बाबाच कीं काय असें तिला वाटलें. बाबानी सांगितलें कीं, हो मी अशा अनेक रूपांनीं विचरत असतों. " पाहीं भूतमात्रीं जो मज । तोचि माझिया प्रीतीचा समज ॥

तरी तूं भेदबुद्धीतें त्यज । ऐसीच भज मजलागीं ॥ १३० ॥ वचन नव्हे तें परमामृत । सेऊनि बाई सद्गदीत ॥ नेत्र आनंदाश्रू भरित । कंठ दाटत बाष्पांहीं ॥ १३१ ॥ अशा-तऱ्हेचीं हीं एक दोनच उदाहरणें नव्हेत, तर शेंकडों उदाहरणें बाबांचीं देतां येतील. धन्य त्या साईमाऊलीची !

जिंकण्यांत सोपा विकार.

(श्रीसांईलीला व ५. अं. ११-१२, पान ६४९). एकदां बाबा नानास म्हणाले-सर्व षड्रिपूंत जिंकण्यांत सोपा विकार कोणता ? नानानी सांगितलें कीं मला माहीत नाहीं. तेव्हां बाबा म्हणाले, अरे **मत्सर.** हा विकार जिंकण्यांत सर्वांत सोपा. यांत आपलें नफा नुकसान कांहीं नाहीं. मत्सर म्हणजे दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न होणें. दुसऱ्याचा उत्कर्ष पाहिला कीं, आपणांस तें सहन होत नाहीं आपण त्याची निंदा व कुचेष्टा करितों. दुसऱ्यास ऐश्वर्य प्राप्त झालें तर आपलें त्यांत काय नुकसान आहे ? उलट आपण आनंद मानावा आणि हवें तर आपणहि तसें ऐश्वर्य मिळवूं अशी हिंमत धरावी आणि नेटानें प्रयत्न करावा. पण इतरांचा उत्कर्ष झाला म्हणून आपण विषाद मानूं नये—

'प्राण्या बोलावें बहु गोड, पण खरें.'

(श्रीसांईलीला. व. ५. अंक. ११-१२, पान ६४९-६५३ आणि श्रीसाईसच्चरित. अ. ३८-१२६-१४६)

बाबानीं एकदां नानाला असा धडा दिला कीं, सार्वजनिक कामासाठीं कोणी कांहीं आपले जवळ मागूं लागला तर आपणास कांहीं मदत करितां येण्याजोगी असेल तर अवश्य करावी. तशी मदत करितां येत नसेल किंवा इच्छा नसेल तर तसें स्पष्ट गोड शब्दात सांगावें. उपहास अगर थट्टा करूं नये, किंवा रागावूं नये इत्यादि. नाना म्हणाले कीं हें मी ध्यानांत ठेवीन आणि त्याप्रमाणें वागेन. बाबा म्हणाले, हा धडा जितका सोपा दिसतो तसा तो नसून आचरण्यास कठीण आहे. तेव्हां नाना म्हणाले—हा धडा मी मनापासून लक्ष्यांत ठेवून आचरणांत आणीन.

शापूर्वी असा प्रकार घडला होता कीं, कोपरगांवीं शिरडीच्या रस्त्याच्या सडकेवर श्रीगोदातटीं एक लहानसें दत्तमंदीर असून शिरडीस येतांना नानासाहेब या मंदिरांत दत्तदर्शन घेण्याकरितां नेहमीं जात असत. त्या मंदिरांत राहणारे बोवा गरीब व साळस होते. त्यांचा व नानासाहेबांचा परिचय झाला. पुढें कांहीं दिवसांनीं, नानाहेब हे मोठे उदार व भाविक आहेत अशा समजुतीनें त्या बोवांनीं त्यांचेजवळ अशी एक गोष्ट काढली कीं, या दत्तमंदीरासमोरील नदीवर घाट बांधून द्यावा, घाट बांधल्यास लोकांची धुण्याची व स्नानसंध्येची सोय होईल आणि हें श्रेय नानासाहेबानीं घ्यावें. हें काम आपल्या आंवाक्याबाहेरचें आहे असें नानासाहेबांनीं सांगितलें. वरचेवर बोवा याविषयीं नानासाहेबाना सांगत असत. पण नानासाहेब कांहीं कबूल करीत नसत. बोवांच्या नेहमींच्या बिनवण्याला नकार देणें नानासाहेबाना जड जाऊं लागले आणि त्यानीं सांगितलें कीं, सर्व घांट बांधून घेणें तर हजारों रुपये लागतील व तशी तजवीज होणें शक्य नाहीं, पण मंदिराच्या रुंदी इतकाच दहा बारा पायऱ्यांचा घांट बांधणेस अजमासें तीनशें रुपये खर्च येईल आणि तो मी करीन. इतके झालें तरी पुष्कळ काम होईल असें बोवानीं सांगितलें. याप्रमाणें दोघांचें भाषण होऊन नानासाहेब नगरास गेले.

पुढें कांहीं दिवसांनीं नानासाहेब आपले साडु बिनिवाले यांना घेऊन बाबाच्या दर्शनाला निघाले. थोडीशी रात्र असतांच ते कोपरगांवीं आले. तेव्हां नानासाहेबाच्या मनांत आलें कीं, दत्तदर्शनासाठीं आपण मंदिरांत गेलों तर बोवा आपलेपाशीं तीनशें रुपये मागेल, तर ते आपण बरोबर आणले नाहींत, किंवा त्याबाबत कांहीं व्यवस्थाही अद्याप केलेली नाहीं. तेव्हां काय करावें ? इतक्यांत त्यांना एक युक्ति सुचली कीं, या खेपेस मंदिरावरून न जातां परभारें दुसऱ्या मार्गानें शिरडीस जावें. ही युक्ति बिनीवाल्यांनाहि पटली. पुढें शौचमुखमार्जनासाठीं आडवाटेनें गेले असतां त्याच्या अंगांत बाभळीचे व निवडुंगाचे कांटे बोंचले, यामुळें त्यांना बराच त्रास झाला आणि वाटेंत बरेच हाल झाले. पुढें ते शिरडीस आले आणि मशीदींत बाबाच्या दर्शनास गेले तेव्हां बाबा त्यांचेवर बरेच रुसले आणि रागावले आणि त्यांचेशी बोलण्याचेहि टाळलें. या अबोल्याचें कारण विचारतां सर्वसाक्षी बाबा म्हणाले कीं, अरे नाना, बोवा तीनशें रुपये मागेल म्हणून तूं सरकारचें (श्रीदत्ताचे) दर्शन टाळलेस व आडमार्गानें आलास, अशा रीतीनेंच

मी घालून दिलेला धडा आचरणांत आणतोस काय ? तूं रुपये आणले नव्हतेस किंवा त्यांची सोय तुजकडून झाली नव्हती तर तो बोबा तुला काय खातां ? पैशाची सोय झालेली नाहीं असें स्पष्ट सांगावयाचें सोडून सरकारदर्शन टाळून आडमार्गानें यावयाचें ही कोठची युक्ति ? पायांत व अंगांत कांटे शिरून प्रायश्चित मिळालें कीं नाहीं ? अशा मनुष्यांशीं आपण कां बोलावें ? बाबांच्या सर्व साक्षीत्वाबद्दल कौतुक वाटून नानांनी आपली चूक कबूल केली आणि पुनः आपण असें करणार नाहीं असें बोलून बाबांना वंदन केलें.

भिक्षेकऱ्यांशी वर्तन

(श्रीसाईलीला व.१. अं. ५ पान ४५ व वर्ष ५, अंक ११–१२, पान ६५३–६५६) वर सांगितल्यासारखाच भिक्षेकऱ्यांशी कसें वागावें यासंबंधीं बाबांनीं नानाला एकदां असा धडा दिला कीं, आपल्याकडे कोणी मागावयास आला तर त्याला आपल्या शक्तीप्रमाणें व इच्छेप्रमाणें द्यावें, तेवढ्यानें त्याची तृप्ति होत नसेल तर गोड शब्दांनीं नाहीं म्हणून सांगावें, त्याचेवर रागाऊं नये किंवा आपल्या संपत्तीचा अथवा अधिकाराचा जोर दाखवूं नये. नानासाहेबांनीं हें मान्य केलें आणि आपल्या गांवीं (कल्याणास) निघून गेले. कांहीं महिने लोटल्यावर त्यांचे वाड्यांत एक भिकारीण भीक मागणेस आली. नेहमींप्रमाणें नेहमीची भिक्षा घरांतील मंडळी घालूं लागली तरी ती भिकारीण भिक्षा घेईना. नानासाहेबांच्या पत्नीनीं डेराभर भाजणी तयार करून ठेविलेली होती. भिकारीण म्हणूं लागली कीं मला भिक्षा नको, भाजणी घाला. तेव्हां तिला कांहीं थोडी भाजणी घालणेंत आली. ती पुनः अधिक भाजणी मागूं लागली. माईसाहेबानीं अधिक भाजणी घातली तरी तिचें समाधान होईना. शेवटीं अर्धी भाजणी घालणेचें कबूल केलें तरी ती कबूल होईना, सर्व डेराभर भाजणी मागूं लागली. तेव्हां माईसाहेब रागावल्या आणि म्हणाल्या कीं, तुं फार शहाणी दिसतेस. वाटेल तर अर्धी घे, नाहीं तर जा येथून. ती हट्टी भिकारीण आपलाच हेका धरून बसली आणि घराबाहेरहि जाईना. तेव्हां निरुपाय होऊन माईसाहेबानी ही सर्व गोष्ट दिवाणखान्यांत बसलेल्या नानासाहेबाच्या कानावर घातली. तेव्हां नानासाहेब रागावून खालीं आले आणि शिपायाला म्हणाले कीं, भिकारीण तर भिकारीण आणि म्हणते

सगळीच भाजणी द्या, सगळी भाजणी मागावयास हिला लाज तरी वाटते का ? देतात तितकी घे, नाहींतर हिला हांकलून द्या. भिकारीण म्हणाली, सगळी भाजणी द्यावयाची नसेल तर नका देऊं, पण शिपायांकडून गचांडी देऊन कशाला हांकलून देतां, मीच जातें आपली, असें म्हणून ती निघून गेली.

पुढें कांहीं दिवसांनी नाना बाबाच्या भेटीस शिरडीस गेले. तेव्हां बाबा पुनः रागावले आणि नानाशीं बोलणें टाळलें. नानांनी विनंति करितांच बाबा म्हणाले कीं, सांगितलेला धडा जो आचरणांत आणीत नाहीं त्याचेशीं कां बोलावें ? सर्व भाजणी मागणाऱ्या भिकारणीस तूं शिपायांकडून हांकून लावणार होतास ना ? ती कांहीं वेळ तुझ्या दारांत बसून निघून गेली असती. गोड शब्दांनीं तिची बोळवण करणेचे ऐवजीं तिला शिपायांकडून घालवून देण्याची मजल कां आणली ? पांच सहा महिन्यापूर्वी घडलेल्या या गोष्टीचें स्मरण नानासाहेबांस प्रथम होईना. पुढें लगेच त्यांना त्या भिकारणीची गोष्ट आठवून त्याना याविषयीं सानंदाश्चर्य वाटलें. बाबा अशा प्रकारच्या भिकारणीचें सोंग घेऊन आपली परीक्षा घेतील ही कल्पना त्यांचे मनांत नव्हती. पण बाबाचा धडा किंवा शिकवण देण्याची तऱ्हा आणि शिष्य ती शिकवण आचरणांत आणतो कीं नाहीं याची परीक्षा घेण्याची बाबाची तऱ्हा पाहून नानाच्या मनांत प्रेमादर वाढला हें सांगणें नलगे—

वरील कथेंत वर्णन केल्याप्रमाणें भिक्षेकरी वेळीं अवेळीं येऊन घरांतील मंडळींना भंडावून सोडतात हा अनुभव बहुतेक सर्व घरवाल्यांना नेहमीं येतो. बाबाच्या उपदेशाप्रमाणेंच आमच्या एका व्यवहार चतुर मित्रानें याविषयीं तोडगा सांगितला तो असा— भिकारी लोकांना आपल्या वेळेची किंमत समजते. त्यांना एक दोनच नव्हे तर अनेक घरें फिरून आपलें भिक्षासंपादनाचें काम करावयाचें असतें. तेव्हां तें आपला वेळ उगाच व्यर्थ दवडत नाहींत. त्यांचेशीं तकरार किंवा वाद करीत राहिल्यास तेहि अनेक धार्मिक युक्त्या, दयामाया इत्यादि कारणें पुढें आणून आपलें काम साधुं पहातात. पण घरचे मालक वाद घालत न बसतां गोड शब्दानें नकार देऊन स्वस्थ बसतील आणि येथें आपणास कांहीं मिळणार नाहीं अशी खात्री पटवून देतील तर भिकारी अशा ठिकाणीं आपला 'अमूल्य' वेळ व्यर्थ न दवडितां पुढें चालते होतात. तेव्हां घरवाल्यामंडळींनीं साईबाबाचा धडा किंवा शिकवण अंमलांत आणून भिकाऱ्यांची बोळवण,

शक्य तर मदत किंवा भिक्षा देऊन, तसें नसेल तर गोड शब्दांनीं तरी करावी हें योग्य आहे.

मांगाला दिलेलें दान बाबांना पोंचलें.

(श्रीसाईलीला व. २ अं. ६ पा. २०९) एकदां नानासाहेब शिरडीस आले असतां सूर्यग्रहणाची पर्वणी आली. त्या पर्वणीसाठीं कोपरगांवास गोदावरी स्नानास जाण्याची त्यांना इच्छा झाली. बाबांची परवानगी घेऊन ते गोदास्नानास कोपरगांवीं गेले. तेथें ग्रहण लागल्यावर ते नदींत स्नानास उतरले असतां 'दे दान छुटे गिरान' असें ओरडत एक मांग त्यांचेकडे आला. नानांनीं त्याला दोन पावल्या दिल्या. शिरडीस त्याच वेळेला बाबा आनंदराम मारवाड्याला म्हणाले कीं, या पहा दोन पावल्या मला नानांनी दिल्या. असें म्हणून त्यांनीं त्या पावल्या आपल्या खिशांत घातल्या.

बाबाचें भूतभविष्य ज्ञान.

(श्रीसाईलीला व. ३ अं. १ पान ३१७) नानासाहेब कलेक्टर साहेबाबरोबर चिटणीस म्हणून फिरतांवर असतांना दोन दिवसांची सुटी असल्यामुळें साहेब मुंबईस गेले व नाना शिरडीस आले. सुटी संपल्यावर नानांनी कोपरगांवास जावयाचें आणि आपल्या हाताखालच्या मंडळी समवेत पुढील मुक्कामीं साहेबाबरोबर जावयाचें असें ठरलें होतें. बाबांनीं नानाला सुटी संपतांच परत जाण्याची परवानगी दिली नाहीं. एक दिवस अधिक ठेवून घेऊन नंतर त्याला जाऊं दिलें. ऑफिसची मंडळी साहेबाबरोबर पुढील मुक्कामीं गेली असेल अशा समजूतीनें नाना कोपरगांवीं आले, तों सर्व मंडळी त्यांना तेथेंच आढळली. आणि त्यांनीं सांगितलें कीं, 'मी एक दिवस उशीरां येणार आहे तर ऑफिसच्या मंडळीनीं दुसरे दिवशीं नेमलेल्या मुक्कामीं हजर व्हावें' अशी साहेबाची तार आली. अर्थात् बाबानीं एक दिवस अधिक ठेवून घेतलें तें योग्यच होतें हें नानासाहेबाना पटून आनंद झाला.

एका मुसलमानाची पेटी.

(श्रीसाईलीला व. ४ अं. ६. पान ५३१) एकदां एक मुसलमान बाबाकडे

आला आणि दर्शन घेऊन प्रार्थना करूं लागला कीं, बाबा सुरंगी दारूचा व बत्त्यांचा मला परवाना मिळत नाहीं, मी कलेक्टरसाहेबाकडे पुष्कळ अर्ज केले, पण दाद लागत नाहीं. कसेंही करून मला तो परवाना मिळवून द्या. बाबा म्हणाले कीं, बरें नानाला येऊं दे म्हणजे तुला परवाना द्यावयाला मी त्याला सांगेन. कांहीं दिवसांनीं नाना तेथें आले. तो मुसलमान त्याचवेळीं तेथें हजर होता, बाबा म्हणाले नाना, या मुसलमानास तो मागत असलेला परवाना दे. नाना म्हणाले कीं, यानें दोनवेळां अर्ज केले, त्याला परवाना देऊं नये म्हणून कलेक्टरसाहेबांचा हुकुम झालेला आहे, आतां त्याला परवाना मिळणार नाहीं. बाबा म्हणाले—तूं आतां साहेबास सांग म्हणजे तो देईल. या मुसलमानाची एक पेटी आपल्याकडे असलेली तो आता परत मागत आहे, ती त्याला देऊन टाकावी हें योग्य आहे. तेव्हां नानासाहेबानीं त्या मुसलमानास सांगितलें कीं, तूं आणखी एक वेळां अमुक ठिकाणीं अर्ज कर आणि तुझी सर्व हकीकत साहेबांस सांग. त्याप्रमाणें त्यानें तिसऱ्यांदा अर्ज दिला. कलेक्टरसाहेबानी याबाबत नानाला विचारलें. तेव्हां दोनदां याचा अर्ज नाममंजूर झाला आहे तरी फिरून पुनः तो अर्ज करीत आहे. तेव्हां साहेब म्हणाले कीं, या अर्जदारास बत्त्या व सुरंगी दारु कशासाठीं पाहिजे? तेव्हां त्यानें असा खुलासा केला कीं, सरकारांतून शेतसुधारणेकरितां व त्याची बांधबंदिस्ती करण्याकरितां आपण पांचशें रुपये तगाई घेतलेली आहे हा परवाना मिळाला नाहीं तर हें काम मुदतशीर होणार नाहीं, शेत पिकणार नाहीं व तगाईचे हप्ते वक्तशीर पोंचणार नाहींत. हें सर्व ऐकतांच साहेबांनीं सांगितलें कीं, ही हकिकत पूर्वीं माझ्या नजरेस कां आणली नाहीं, आतांच्या आतां याला परवाना तयार करून द्या. त्याप्रमाणें तो तयार होऊन साहेबाची सही होऊन त्याला मिळाला. पूर्वीं हा मुद्दा कोणाचे लक्ष्यांत आला नाहीं, तो याच खेपेस पुढें कसा आला हें आश्चर्य होय. त्या मुसलमानानें कसली पेटी बाबापाशीं ठेविली होती याचा खुलासा नानासाहेबानी असा केला कीं, त्यानें पूर्वजन्मीं केव्हांतरी महाराजांच्या जवळ कांहींतरी सत्कृत्य केलें असावें; त्याचें फळ तो आतां या रूपानें मागूं लागला, म्हणून बाबा म्हणाले कीं, त्याचें फल आपण त्यास देऊन टाकूं आणि तें त्यांनीं त्यास या रूपानें दिलें.

दोन यवन स्त्रिया—" बनतां बनतां बनले "

(श्रीसाईलीला. व. ४ अं. ६. पान ५३३-३५ आणि श्रीसाईसच्चरित

अं. ४९—१४७—१८३) एकदां नानासाहेब, म्हाळसापती इत्यादि भक्त मशीदींत बसले असतां एक विजापूरचा श्रीमान मुसलमान गृहस्थ परिवारासहित बाबाच्या दर्शनासाठीं आला. स्त्रियांचा गोषा पाहून नाना आपल्या मनांत संकोचले आणि त्यांना जागा करून द्यावी म्हणून उठू लागले. तेव्हां बाबा म्हणाले येणारे त्यांना वर येऊं द्या, नाना तूं स्वस्थचित्तानें बैस. त्यानंतर त्या स्त्रिया वर आल्या आणि आपल्या मुखावरील बुरखा दूर करून बाबाच्या चरणीं वंदन करून तेथें बसल्या. त्यांपैकीं एक स्त्री वृद्ध व दुसरी अगदीं तरुण असून फार सुंदर होती. तिचा चेहरा पाहून नाना निजअंतरीं मोहित झाले लोकांसमक्ष तिच्याकडे पहावें तर पंचाईत, आणि पाहिल्याशिवाय राहवेना अशी त्यांचे मनाची चलबिचल स्थिती झाली. शिवाय त्याना बाबाची मोठी लाज वाटूं लागली आणि त्यांना आपलें मुख वर करवेना. त्यावेळीं बाबांनीं नानाला जो उपदेश केला तो ऐका—

नाना किमर्थ गडबडसी मनीं । ज्याचा निजधर्म तो स्वस्थपणीं ॥
आचरतां आड यावें न कोणी । कांहीं न हानी तयातें ॥ १५८ ॥

ब्रह्मदेव सृष्टी रचितां । आपण तयाचें कौतुक न करितां ॥
व्यर्थ होऊं पाहील रसिकता । 'बनतां बनतां बनेल' ॥ १५९ ॥

असतां पुढील द्वार उघडें । जावें कां मागील द्वाराकडे ॥
एक शुद्ध अंतर जिकडे । तेथें न सांकडें कांहीं ही ॥ १६० ॥

कुढा भाव नाहीं अंतरीं । तयास काय कोणाची चोरी ॥
दृष्टी दृष्टीचें कर्तव्य करी । भीड मग येथें धरिसी कां ॥१६१॥

बाबा म्हणाले— मन हें जातीचेंच चंचल आहे. तरी आपण त्याला उच्छृंखळ होऊं देऊं नये. कांहीं कारणांनीं इंद्रियांची खळबळ झाली तरी शरीर उतावीळ होऊं देऊ नये. इंद्रियांचा विश्वास धरूं नये आणि विषयाची लालसा बाळगूं नये. याप्रमाणें अभ्यास करतां करतां चित्ताचें चांचल्य हळुहळु नाहींसे होईल. आपण इंद्रियाचें आधीन केव्हांहि होऊं नये. पण तींही सर्वथा दाबून ठेवितां येत नाहींत म्हणून प्रसंगानुसार त्यांचें विधिपूर्वक नियमन करावें.

रूप हा तो दृष्टीचा विषय। सौंदर्य वस्तूचें पहावें निर्भय ॥
तेथें लाजेचें कारण काय। द्यावा न ठाव दुर्बुद्धीतें ॥ १७३ ॥
मन करोनियां निर्वासन। ईशकृतीचें निरीक्षण ॥
होईल सहज इंद्रिय दमन। विषयसेवन विस्मरण ॥ १७४ ॥

* * *

बाह्येंद्रियें जरा निवृत्त। असतां अंतःकरण आसक्त ॥
नाहीं जन्ममरणा अंत। विषय अत्यंत घातुक ॥ १८० ॥
लाधलिया विवेक सारथी। विवेकें राखी लगाम हातीं ॥
इंद्रियवाजी कुमार्यवर्ती। स्वप्नीं हीं होती न लवमात्र ॥ १८१ ॥
ऐसा मनःसमाधानपर। निग्रही दक्षकुशल चतुर ॥
भाग्यें लाधलिया सारथी चतुर। कैचें दूर विष्णुपद ॥ १८२ ॥

हा सुंदर उपदेश नानासाहेबांना आणि त्यांच्याद्वारें सर्व भक्तांनां बाबांनीं केला आहे. त्याप्रमाणें वागल्यास सर्वांचें कल्याण होईल.

नानाच्या वडीलाची ताकीद.

(श्री साईलीला. व. ४ अं. ६ पान ५३५-५३८) नानासाहेबाच्या वडीलाचा कल्याणचे कांहीं लोकांशी कांहीं बाबतींत बेबनाव झाल्यामुळें आपल्या घरीं त्यांस येऊं द्यावयाचें नाहीं व बोलवावयाचें नाहीं व आपल्या घरच्या कोणच्याही मनुष्यानें त्या कोणाचे घरीं जावयाचें नाहीं अशी ताकीद त्यांनीं घरीं देऊन ठेविली होती यावेळीं नानासाहेब बाहेरगांवीं नोकरीवर होते. घरीं आल्यावर त्यांना ही ताकीद समजतांच ते मोठ्या पंचाइतींत पडलें. ते स्वतः पितृभक्त व पित्राज्ञाधारक होते. पण आपले वडील जुन्या मताचे असून करारी स्वभावाचे होते हें ते पक्के जाणत होते. नानासाहेबाचे सहाध्यायी व मित्र असे वरील पैकींच होते. त्यांचेशी एखादेवेळीं संबंध वर्ज्य करितां येईल.

गुरुसांईबाबा यांचेकडे जाणें कसें बंद करावयाचें ? हा मोठा प्रश्न नानासाहेबापुढें पडला. तेव्हां नानासाहेबानें मोठ्या धैर्यानें आपल्या अडचणी आपल्या वडीलांपुढें मांडल्या. तेव्हां ते म्हणाले.....अरे शिरडीचे सांईबाबा तेच तुझे गुरु आहेत, तूं त्यांचेकडे जात जा. हें ऐकून नानासाहेबाना अत्यानंद होऊन त्यांचे नेत्र प्रेमाश्रूंनी भरून आले. बाबांनीं आपले वडीलास ही एवढीच अपवादात्मक प्रेरणा कशी केली ही एक त्यांना बाबांची अतर्क्य लीला वाटली आणि बाबावरील त्यांची श्रद्धा व भक्ति दृढावत चालली.

'अतिथि' शब्दाचें स्पष्टीकरण.

(श्रीसाईलीला पृ. ६. अं. १-२ पान ६७०).

आपण रोज देवपूजा झाल्यानंतर वैश्वदेव करून बाहेर जाऊन काकबलि टाकितों आणि गाईची धार काढण्यास जितका वेळ लागतो तितका वेळ दुरून चालून आल्यामुळें थकून भागून आलेल्या अतिथींचें शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें आदरातिथ्य करून अन्नदानानें सत्कार करावा म्हणून बाट पहातों, पण असा अतिथि कधींच मिळत नाहीं तेव्हां शास्त्रांत सांगितलेलें हें विधान बरोबर आहे कीं नाहीं अशी शंका नानासाहेबाच्या मनांत आली आणि ती शंका एकदां शिरडीस गेल्यावर त्यांनीं बाबांना विचारिली. बाबांनीं याचा खुलासा असा केला कीं, अरे अतिथि म्हणजे साडेतीन हात उंचीचा मानव देहधारी ब्राह्मण असाच असावयास पाहिजे काय ? अतिथींची व्याख्या इतकी आकुंचित नाहीं. ज्याचें अन्तःकरण भुकेनें व्याकूळ झालें आहे आणि ज्याला अन्नाची अतिशय जरूरी आहे असा जो कोणी जीव त्यावेळीं येईल तो अतिथि. मग तो मनुष्य असो, पशु असो, पक्षी किंवा कीड मुंगी असो. हे सर्व जीव अन्नाच्या शोधार्थ दूर दुरून येत असतात, त्यामुळें ते थकले भागलेले असतात आणि त्यांचें अंतःकरण पीडित झालेलें असतें. परंतु तुझें लक्ष त्यांचेकडे असतें कधीं ? तुझा असा विपरीत गृह झालेला दिसतो कीं, अतिथि म्हणजे औट हाताचा मानव देहधारी ब्राम्हण! असे अतिथि वैश्वदेव करून काक बलि टाकिल्यावर येत नाहींत. पण मी वर सांगितलेले खरे अतिथि त्यावेळीं येतात पण तूं त्यांना अतिथि म्हणून ओळखीत नाहींस असें खरें. अतिथि किती तरी लाखों तुझ्या घरीं जेऊन गेले आहेत व जात आहेत पण तुला यांतील मर्म न समजल्यामुळें अतिथींच्या सत्कार अन्नदानाचें श्रेय मिळत नाहीं. याकरितां या शब्दाचा भलताच

संकुचित अर्थ टाकून दे आणि काकबलि टाकण्याच्या वेळेस बराचसा भात बाहेर नेऊन ठेवीत जा. कोणताहि जीव तो भात खाण्यास आला तर मनांत विकल्प न आणतां तो त्यास खाऊं दे. म्हणजे अनंत अतिथि तुझ्या घरी जेवल्याचें पुण्य तुला मिळेल.

अतिथि शब्दाच्या बाबांच्या ह्या विश्वव्यापक अर्थाने नानांची शंकानिवृत्ति होऊन त्यांचे समाधान झालें आणि बाबांच्या अगाध ज्ञानाचें व अतुल सामर्थ्याचें त्याना फार कौतुक वाटलें. बाबाचें हें स्पष्टीकरण वाचून तसें कौतुक प्रत्येक सहृदय वाचकाला वाटल्यावाचून राहणार नाहीं.

पंढरपूरला जायाचें जायाचें.

(श्रीसाईचरित, अ. ७–११० ते १२५)

नानासाहेब नंदुरबाराला असतांना त्यांची बदली पंढरपुरास झाली आहे असा हुकुम आला. लवकर पंढरपुरास जावयाचें होतें म्हणून तांतडीनें सर्व तयारी केली आणि सहकुटुंब सपरिवार आधीं शिरडीस बाबांचे दर्शनास जाण्याचा विचार करून ते निघाले. कोणास पत्र पाठविलें नाहीं किंवा निरोप कोणाबरोबर धाडला नाहीं. सर्व सामान आवरून लगबगा गाडींत बसले, हें वर्तमान इतरांस समजलें नाहीं पण 'सर्वत्र डोळे असलेल्या सर्वसाक्षी बाबांना कळलें. कारण नाना सत्वर निघून निमगांवच्या सीमेवर येतात तोंच शिरडींत काय चमत्कार झाला पहा. मशीदींत बाबा, म्हाळसा पती, आप्पा शिंदे, काशीराम इत्यादिकांबरोबर गोष्टी करीत बसले होते. बाबा एकदम म्हणाले–चला आपण चौघेजण मिळून भजन करूं या, पंढरीचे दरवाजे उघडले आहेत, आम्ही मौजेनें भजन करूं असें म्हणून त्यांनीं भजन सुरू केलें तें असें –

पंढरपुरला जायाचें जायाचें । तिथेंच मजला राह्याचें ॥
तिथेंच मजला राह्याचें । राह्याचें । घर तें माझ्या रायाचें ॥

बाबा हें भजन म्हणूं लागले, इतर भक्त त्याचा अनुवाद करूं लागले आणि सर्वजण पंढरीच्या प्रेमांत रंगून गेले. इतक्यांत नाना कुटुंबासह आले आणि बाबांना वंदन करून म्हणूं लागले कीं–आतां आम्हांसमवेत महाराजांनीं निश्चित पंढरपुरांत राहावें ही विनंती करण्याचें प्रयोजनच नव्हतें; कारण इतर भक्तांनीं बाबांची-गमन

भजन स्थिती त्यांना सांगितली. ही लीला पाहून नाना आश्चर्यचकित व सद्गदीत झाले, पुढें ते आशीर्वचन, उदी व निरोप घेऊन पंढरपुरास गेले.

यापुढील कांहीं अनुभव श्रीसाईलीला व १६ अंक १-२-३ यांतून घेतलेले आहेत.

'या आजीबाई' बाबा नानासाहेबाच्या पत्नीस नेहमीं आई म्हणून हांक मारीत. एकदां मशींदींत त्या दर्शनास गेल्या असतां बाबा म्हणाले 'या आजीबाई' हें ऐकून आई साहेबांना आश्चर्य वाटलें. आईच्या ऐवजीं आजीबाई म्हणून कां संबोधिलें हें त्यांना कळेना. बिऱ्हाडीं गेल्यावर ही हकीकत त्यांनीं नाना साहेबास कळविली तेव्हां त्यांनी चटकन सांगितलें कीं, अग आपली द्वारकी बाळंतीण झाली असली पाहिजे. त्यांची धाकटी कन्या सौ. द्वारकाताई इचा प्रसूतिमय अगदीं समीप आला होता आणि त्यामुळें त्या काळजींत होत्या. दुसरे दिवशीं त्यांच्या प्रसूतीचें पत्र आलें. त्यावरून बाबांनीं जेव्हां आजीबाई असें संबोधिलें होतें त्याच वेळीं द्वारकाताई बाळंत झाल्या होत्या. यावरून बाबांचें सर्वसाक्षि-ज्ञान किती अगाध आणि वाणी किती अर्थपूर्ण होती हें दिसून आलें.

माझी आई दळदळ दळती पण समदच भरड ?

नाना साहेबाच्या उपदेशाप्रमाणें आईसाहेब नेहमींच जप करीत असत. त्या एकदां पतिसमवेत शिरडीस गेल्या आणि बाबांना वंदन करून जवळ बसल्या. तेव्हां बाबा म्हणाले—'माझी आई कनी दळदळ दळती, पण आई समद भरड बरं कां ग ? आईसाहेबांना या म्हणण्याचा अर्थ समजला नाहीं. बिऱ्हाडीं गेल्यावर त्यांनीं ही हकिकत नानासाहेबांस सांगितली. तेव्हां ते म्हणाले–'अग खरंच–तूं पुष्कळ जप करतेस खरी, पण तुझें लक्ष्य दुसरीकडे कुठें तरी असतें. लक्षपूर्वक जप केला पाहिजे. (तज्जपस्तदर्थ भावनम्). नुसतीं तोंडानें अक्षरें पुटपुटण्यांत काय फायदा ? त्या त्यानंतर त्या लक्ष्यपूर्वक जप करूं लागल्या.

तुमचीं कामें तुम्हीं करा, आम्हीं कांहीं आतां मरत नाहीं.

इ. स. १९१५ सालची गोष्ट. त्यावेळीं बाबा अत्यंत आजारी पडले व त्या दुखण्यांतून ते बरे होतील असें कोणास वाटेना. नानासाहेबांनीं बहुतेक साईभक्तांना ही हकीकत कळविली. त्याप्रमाणें पुष्कळ मंडळी तेथें आली. आणि बाबांना त्या दुखण्यांत आराम पडून अरिष्ट शांत व्हावें म्हणून जप, वेदमंत्रपाठ, लघुरुद्र चंडीपाठ इत्यादि अनुष्ठानें सुरू करणेंत आलीं. एक दिवस असा आला कीं, दुखण्याचा

जोर फार वाढला आणि बाबाच्या जिवीत्वाचा आशातंतू आत्तांच तुटतो कीं काय असें प्रत्येकास वाटूं लागलें. तेव्हां दीक्षितांच्या वाड्यांत, काकासाहेब दीक्षित, बापुसाहेब जोग, बाळासाहेब भाटे, तात्या पाटील कोते वगैरे मंडळींचा असा विचार ठरला कीं, या दुखण्यांत बाबांचें जर कां कांहीं बरं वाईट होईल तर त्यांचें शव दरग्यांत न्यावयाचें किंवा त्यांना वाड्यांत समाधि द्यावयाची हें आतांच बाबांकडून निश्चित करून घेतल्यास पुढें हिंदु-मुसलमानांत लढा पडणार नाहीं.

पण हें बाबांना विचारावें कसें व कोणी ? याचा विचार करितां करितां नाना साहेबांनीं हें काम करावें असा सर्व मंडळीचा आग्रह पडला पण ते म्हणाले कीं मी हें कसें विचारूं ?· इतक्यांत बाबाकडून एक मनुष्य नानासाहेबाची चौकशी करीत दीक्षीताच्या वाड्यांत आला आणि नानासाहेब तेथें आहेत असें पाहून त्यांनें बाबाचा असा निरोप सांगितला कीं आमच्या मरणाची चवकशी आतांच करूं नका. आम्ही कांहीं आतां मरत नाहीं. तुमचें चाललेलें काम अनुष्ठान वगैरे तुम्हीं पुरें करा इत्यादि. हें ऐकून बाबाच्या सर्व व्यापकत्वाबद्दल सर्वांना आश्चर्य वाटलें. पुढें सर्व अनुष्ठानें यथासांग पार पडलीं, बाबांना आराम पडला आणि जमलेल्या सर्व मंडळीस नाना साहेबानीं शिऱ्याचें भंडार भोजन दिलें.

नानाच्या ढुंगणावरील गळूचें ऑपरेशन.

एकदां नानासाहेबांस ढुंगणावर एक मोठें गळूं झालें आणि त्यापासून त्यांना बराच त्रास होऊं लागला. पुष्कळ उपचार केले, पण कशानेंहि गुण येईना. तें गळू सुजून ठणका सुरू झाला. नेहमीं कांहीं झालें तरी नानासाहेबाची फिर्याद बाबाकडे जावयाची, पण या खेपेस त्यांनी निश्चय केला कीं, कांहीं होवो मी बाबावर संकट घालणार नाहीं. त्याप्रमाणें त्यांनीं डॉक्टर वैद्य यांचे उपाय करून पाहिले. शेवटीं मुंबईस जाऊन चांगल्या सर्जनकडून ऑपरेशन (शस्त्रक्रिया) करून घ्यावें असें सर्वानुमतें ठरलें. नानासाहेब शस्त्रक्रिया करून घेणेस फार भीत असत. पण इष्टमित्रांच्या, व डॉक्टरांच्या आग्रहामुळें व यातना भीषण होत चालल्या-मुळें त्यानां शस्त्रक्रियेस रुकार द्यावा लागला. शेवटीं एक दिवस मुक्रर करून ते कल्याण हून मुंबईस आले व तेथें आपल्या बिऱ्हाडांतील खोलींत खाटेवर विव्हळत पडले. नामांकित शस्त्र वैद्य आले आणि या गळवास शस्त्रक्रिया करणें जरा धास्तीचें आहे, कारण तें प्रमाणाबाहेर गेलें आहे. तरी आपण भिऊं नका, सर्व सामुग्रीसह

आपण शस्त्रक्रिया करण्यास ठरलेल्या दिवशीं सकाळीं येतों असें सांगून निघून गेले. नानासाहेबांना इतकी घास्ती वाटली कीं, आपण यांतून आतां वाचत नाहीं. शेवटीं ठरलेल्या दिवशीं बाबांची छबी उशापाशीं घेऊन ते निजले पण जसजसा शस्त्रक्रियेचा क्षण जवळ येऊं लागला तसतशी त्यांची धडकी वाढत चालली. आतां आपली धडगत दिसत नाहीं असें वाटून एक सारखी तळमळ, वेदना व भीती यांचें साम्राज्य सुरू झालें. सर्जन येण्यास १०-१५ मिनिटें राहिलीं. इतक्यांत एक मोठा चमत्कार झाला. नानासाहेब गळवाची बाजू वर करून अनाच्छादित निजले असतां एकाएकीं वरून एक कोलाचा तुकडा नेमका त्या गळवावर पडला तें फुटून त्यांतून पू व रक्त वाहूं लागलें. त्यामुळें नानासाहेबांना अत्यंत सुख वाटलें. सर्जन येऊन पाहतात तों त्यांना झालेल्या प्रकाराबद्दल अत्यंत आश्चर्य वाटलें आणि आतां शस्त्रक्रियेची जरूरी नाहीं असें म्हणून ते निघून गेले यानंतर कांहीं दिवसांनीं नानासाहेब शिरडीस बाबांचे दर्शनास गेल्यावेळीं बाबा म्हणाले—'आम्हांस त्रास द्यावयाचा नाहीं, पण मलाच तुझ्या ढुंगणांत हात घालून तें गळू फोडावें लागलें.' काय हे गुरुमाऊलीचे उपकार, प्रेम, व्याप्ती, अगम्य ज्ञान व सामर्थ्य !

बाबांचा नाताळीं गीतोपदेश.

(श्रीसाईलीला व. ४, अंक १३ आणि श्रीसाईसच्चरित अध्याय ३९ व ५०)

बाबांचें खरें नांव काय, त्यांची जात कोणती, त्यांचा मुळगांव कोणता, याविषयीं कोणाच नक्की माहिती नाहीं. त्यांना म्हाळसापतीनें दिलेलें साईबाबा हें नांव, त्यांचें मशीदींतील वास्तव्य, अल्ला मालिक है. हा त्यांचा नेहमींचा मंत्र आणि 'अल्ला तेरा भला करेगा' हा त्यांचा नेहमींचा आशीर्वाद इत्यादि गोष्टींवरून बाबा मुसलमान होते असें कोणी समजत असतील, पण या उलट दुसऱ्या कांहीं गोष्टी आहेत त्यावरून ते हिंदु होते इतकेंच नव्हे तर ब्राह्मण संन्यासी होते असें दिसतें. त्यापैकीं कांहीं गोष्टी अशा—१ बाबा आपली तिन्ही वेळची आरती व दुपारची पूजा ब्राम्हणाकडून करवून घेत. त्यांची प्रथम पूजा नानासाहेबांचे चि. बापुराव यांनीं केली. तेव्हांपासून बाबांची षोडशोपचार पूजा सुरु झाली. (२) धुनी रूपानें मशिदींत अग्निनारायण अखंड प्रज्वलित असे व आतांहि आहे. कोणत्याहि मशीदींत असा अग्नि ठेवणे हें मुसलमानी धर्माविरुद्ध आहे. (३) बाबा हे कौपिनवंत व कफनी घालणारे होते. त्यांची सुंता झालेली नव्हती. त्यांचे कान टोंचलेले होते (४) दिवसांतून पुष्कळ वेळां अनेक रूपांनीं 'नारायणा'चे नांव घेत

असत. (५) श्री. काशीबाई कानिटकर यांना बाबानीं स्वतः सांगितलें कीं, हा ब्राह्मण आहे, शुभ्र ब्राह्मण आहे, काळ्या वस्तूचा ह्याला संबंध नाहीं, हा शुद्ध ब्राह्मण, आहे. येथें भलता इसम काय पाऊल ठेवील? त्याची येथें येण्याची काय बिशाद! हा ब्राह्मण (छातीला हात लावून) लाखों जणांना शुभ्र मार्गावर नेऊन शेवटपर्यंत पोहोंचविणारा आहे, ही ब्राह्मणाची मशीद (द्वारकामाई) आहे इत्यादि. (श्री साईलीला व. ११ अंक २, ३, ४, पान ७९-८०, अनुभव ८ वा.) (६) बाबा संस्कृत पंडित होते. त्यांनीं सर्व गीता नानासाहेबांस संक्षेप रूपानें पण व्याकरण दृष्ट्या शिकविली असें सांगतात, या संबंधीं एक प्रसंग वर्णन करण्यांत आलेला आहे तो असा:—

एकदां नानासाहेब मशिदींत बसून बाबांचे चरण संवाहन करीत बसले असतां तोंडानें कांहीं गुणगुणत होते. बाबा म्हणाले कीं, नाना तूं काय गुणगुणतो आहेस? नाना उत्तरले कीं, मी एक संस्कृत श्लोक गुणगुणत आहें. बाबानें सांगितलें कीं तो मोठ्यानें म्हण. तेव्हां नानांनी "तद्विद्धि प्रणिपातेन। परिप्रश्नेन सेवया॥ उपदेक्ष्यंति ते ज्ञानं। ज्ञानिनस्तत्वदर्शिनः॥" हा गीता अ. ४, श्लोक ३४ वा म्हणून दाखविला. तेव्हां बाबा म्हणाले नाना याचा अर्थ सांग पाहूं? नाना बहुश्रुत, संस्कृत त्याचा आवडता विषय आणि त्यांत वेदांताचे व गीताभाष्याचें चांगलें परिशीलन केलेले असे होते. त्यांनीं त्या श्लोकाचा अन्वयार्थ सांगितला. तो थोडक्यांत असा- 'तत्ववेत्ते ज्ञानी, त्यांना प्रणिपात केल्यानें ते पुनः पुनः प्रश्न केल्यानें आणि त्यांची सेवा केल्यानें ते ज्ञान तुला उपदेशतील हें लक्ष्यांत ठेव. बाबा म्हणाले प्रत्येक पदाचा अर्थ सांग. त्याप्रमाणें नानानीं प्रत्येक पदाचाहि अर्थ सांगितला. तेव्हां बाबा म्हणाले तृतीय चरणांतील 'ज्ञान' या पदाऐवजीं, तेथें दुसरें कांहीं पद निघतें का? विचार करून नाना म्हणाले होय निघतें. बाबा म्हणाले तें कोणतें? नाना म्हणाले 'अज्ञान' बाबा म्हणाले 'अज्ञान' हें पद घेऊन घेऊन अर्थ लागतो कां? नाना म्हणाले नाहीं. शांकरभाष्य आनंदगिरी, शंकरानंदी, श्रीधरी, मधुसूदनी, नीलकंठी, ज्ञानेश्वरी वगैरे टीकांत ज्ञान हेंच पद घेऊन अर्थ केलेला आहे, त्यावर बाबा म्हणाले याचा पूर्वी केलेला अर्थ असत्य व निरर्थ आहे असें मानूं नका. तो सर्वांना मान्य आहे हें मला ठाऊक आहे पण ज्ञान शब्दाच्या ऐवजीं 'अज्ञान' शब्द घेऊन अर्थ लावून पहा म्हणजे पहा कसा यथार्थ प्रबोध होतो तो. ज्ञान बोलाचा विषय नसल्यामुळें तें उपदेश्य होत नाहीं. 'अज्ञान' हें वाणीचा

विषय आहे ' ज्ञान ' हें शब्दातीत आहे. म्हणुन ' अज्ञान ' उपदेश करुन, स्पष्ट सांगून तें घालविणें हेंच ज्ञान. अज्ञाननाशापेक्षां ज्ञान म्हणून आणखी कांहीं निराळी वस्तु आहे काय ? तिमिरनाश म्हणजे प्रकाश. द्वैतनाश म्हणजे अद्वैत. तसें अज्ञाननाश म्हणजे ज्ञान वार जशी गर्मीला, मल जसा आरशाला, राख जशी अग्नीला किंवा शेवाळ जसें पाण्याला वेष्टून असतें, तसें अज्ञानानें ज्ञान आच्छादित असतें (अज्ञानेनावृतं ज्ञानम- गीता--५--१५) आणि वरचें आवरण काढून घेतलें म्हणजे आंतील वस्तु प्रगटे किंवा गोचर होते.

विश्वाचें सत्यत्व महा भ्रम । होंचि ज्ञानावरण तम ।
निरसूनि जावें लागे प्रथम । प्रज्ञान ब्रम्ह प्रगटे तें ॥
संसारबीज जें अज्ञान । डोळां पडतां गुरु कृपांजन ।
उडे मायेचें आवरण । उरे तें ज्ञान स्वाभाविक ॥ ६९ ॥
देवां भक्तां जें भिन्नपण । हेंच मूळ अज्ञान बिलक्षण ॥
तया अज्ञानाचें निरसन । होतांच पूर्ण ज्ञान उरे ॥ ७० ॥

× + + +

सारांश समूळ अज्ञान खाणा । उरे तें ज्ञान सिद्ध जाणा ॥
ऐसें या श्लोकांचें हृद्गत अर्जुना । श्रीकृष्णराणा सूचवी ॥

— श्री साईसच्चरित. ३९-९८ ॥

याविषयीं विस्तृत विवेचन कोणास हवें असेल तर त्यानी श्री साईसच्चरितांतील वर नमूद केलेले दोन अध्याय आणि श्री साईलीला वर्ष ४ अंक १३ वाचावे. आम्हांस येथें थोडक्यांत हें स्पष्ट सांगावयाचें कीं, बाबांनी सुचवलेलें अज्ञान पद त्याची ज्ञान पदाशीं सांगड घालून सुचविलेला अर्थ अत्यंत मार्मिक, अपूर्व व मौल्यवान आहे यांत शंका नाहीं.

उपसंहार—

नानासाहेबांची बाबांवर अत्युत्कट भक्ति व अमर्याद प्रेम होतें. बाबांनीं त्याचे पाशीं पुष्कळदां दक्षिणा मागितली ती ते मोठ्या प्रेमानें देत असत, इतकेंच नव्हे तर ' नाहीं ' म्हणण्याचा प्रसंग येऊं

नये म्हणून येतांना ते बरोबर आणलेल्या रकमेचा अर्धा भाग नेहमीं कोपरगावांस 'रिझर्व्ह' म्हणून ठेवून येत. पुष्कळदां ही रिझर्व्ह रकमहि बाबा मागत असत व नाना ती देत असत. शिवाय बाबांनीं मारवाड्याकडून जे जे जिन्नस आणावे त्याची सर्व पैन पै बिलें नानाच देत असत. इतकेंच नव्हे तर इतर भक्तांसाठीं शिरडीस पूर्वकाळीं मोठमोठे तंबू ठोकून सर्वांची राहण्याची व जेवणाखाण्याची सोय त्यांनीं केली होती. आपला पुतण्या श्री. बाळाभाऊ चांदोरकर यांना शिरडीस एक लहानसे घर विकत घेऊन त्यांत सहकुटुंब ठेऊन त्यांना एक तांगा देऊन खानावळीची व्यवस्था करून दिली होती. पुढें इतर वाडे होऊन भक्तांची सोय झाली. यामुळें नानासाहेबांना अलोट पुण्यप्राप्ति झाली, हजारों भक्तांचा दुवा मिळाला आणि देवाची (बाबाची) प्राप्ति होऊन ते कृतकृत्य झाले यांत शंका नाहीं. बाबानींहि त्यांना स्पष्ट सांगितलें कीं, संसारासंबंधीं तूं कांहीं मागशील तर तें मजपाशी नाहीं. तें तुला तुझ्या पूर्वकर्मानुसार मिळेल. परमार्थासंबंधीं मार्ग तुला हवा असल्यास दाखवीन. नानासाहेबांनीं ही गोष्ट मोठ्या आनंदानें कबूल केली. त्याप्रमाणें बाबानीं नानाला जे कांहीं परमार्थातील धडे आणि शिकवण दिली त्यांतला कांहीं भाग वर गोष्टीरूपानें आलेलाच आहे. शिवाय बाबांनी नानाला दिलेली शिकवण श्री दासगणूमहाराजांनी आपल्या भक्तलीलामृत (अध्याय ३२ व ३३) व संतकथामृत (अ. ५७) या ग्रंथांत आपल्या प्रासादिक व मधुर वाणीनें वर्णिला आहे. हा एवढाच भाग श्रीसाईलीला वर्ष १७ अं. ११-१२ यांत छापून प्रसिद्ध केला आहे. बाबांची ही परमार्थ शिकवण वाचून मनन निदिध्यासन करून वाचकांनी कृतार्थ व्हावें अशी शिफारस करून आणि बाबाहि त्याना या कामीं मदत करोत आणि सर्वांना सुखशांति देवोत अशी त्यांची प्रार्थना करून बरेंच लांबलेलें हें प्रकरण पुरे करितों.

ना. वा. गुणाजी.

।श्री साईनाथार्पणमस्तु।

श्रीसाईगाथामृत

प्रकरण ७ वें

दासगणू महाराज

(उर्फ गणपतराव दत्तात्रेय सहस्रबुद्धे

आर्वाचीन महीपति (संतचरित्रकार)

आणि

सुप्रसिद्ध कीर्तनकार

उल्हास साई भक्तीचा । दास गणूने
वाढविला सांई प्रेमरसाचा । स्वानंदाचा सागर ॥

—श्रीसांईसच्चरित १५-३२

गेल्या प्रकरणांत भक्तावतंस नाना (नानासाहेब चांदोरकर) यांनीं स्वतः व दास गणू महाराज यांचे द्वारा श्रीसाईबाबाच्या कीर्तीचा प्रसार केला हें सांगितलें आहे. आतां या प्रकरणांत दासगणू महाराजांची हकीकत सांगण्याचें योजिलें आहे. ती सांगण्यापूर्वी दासगणू महाराजांच्या कीर्तनाविषयीं थोडेसें प्रास्ताविक विवेचन करीत आहे.

पुणें, नगर, सोलापूर या प्रांतांत श्रीबाबांची ख्याति पसरलेली होती. पण कोंकणच्या (मुंबईच्या) बाजुस श्री बाबाची माहिती, नानासाहेब चांदोरकर व दासगणू महाराज या दोघांनीं लोकांना करून दिली व त्यांना सांईभक्ति लाविली. दासगणु हे पूर्वी पोलिस खात्यांत नोकर होते. ते उत्तम कवि असून तमाशांत लावण्या वगैरे करून देत असत. नानासाहेबांनीं त्यांना श्री बाबांकडे नेले. त्यांच्या घरीं दामोदर वामन आठवले उर्फ दामुअण्णा नांवाचा एक पोरका, पण गोड कंठाचा

व सुस्वरूपाचा असा मुलगा होता, त्याला त्यांनी दासगणूकडे सांथीदार म्हणून दिला. दामुअण्णाचें मराठी शिक्षण चांगलें झालें होतें. संस्कृताचाहि त्यांनीं थोडासा अभ्यास केला होता. दासगणु व दामूअण्णा ही जोडी म्हणजे 'दुधांत साखर' असा प्रकार झाला होता. त्यांची किर्तनें लोकांना फारच आवडत असत आणि परिणामकारक होत असत.

दासगणूची नारदीय कीर्तन प्रथा

दासगणू एकदां शिरडीस असतां शिष्टाचाराप्रमाणें नीटनेटका पोषाख करून श्री बाबांस भेटणेस गेले, त्यांना वंदन केल्यावर 'नवर देवासारखा सजून कुठें चाललास' असा श्रीबाबानी प्रश्न केला. कीर्तन करावयास जातों म्हणून दासगणूनीं उत्तर दिलें. त्यावर बाबा म्हणाले— 'अंगरखा उपरणें फेटा कशास, क्रिमर्थ केलास इतका प्रयास' हा सर्व भार कशास अंगावर घ्यावा, तो सर्व खाली काढून ठेव. तेव्हां त्यांच्या आज्ञेनुसार दासगणूनी सर्व पोषाख बाबांच्या चरणावर काढून ठेविला आणि 'तनु उघडी होईन पगडी; कांसेसी साधीच पंचेजोडी' या म्हणीप्रमाणें कीर्तन करण्याची प्रथा पाडली.

'तैंपासून उघडे सोंज्वळ । हातीं चिपळा गळां माळ ।
कीर्तनसमयीं सर्वकाळ । गणूदास हा वेळपर्यंत ॥ २७ ॥
ही नारदीय मूळ गादी । येथूनचि हरिदासांची मांदी ॥
बाह्य रंगाची न ज्या उपाधी । अन्तशुद्धि ध्येय ज्यां ॥ २९ ॥

याप्रमाणें नारदीय पद्धतीनें दासगणू लोकांच्या विनंतीला मान देवून कीर्तन करीत असत. 'एका परिग्रह । किंवा दुराग्रह तेथें ना' असा त्यांचा कीर्तनांचा बाणा असल्यामुळें श्रोत्यांची अतोनात गर्दी व अनिवार उडी त्यांच्या कीर्तनप्रसंगी होत असे हें सांगणें नलगे. इतर ठिकठिकाणीं ते कीर्तने करीत असत. तसेंच शिरडीस रामनवमी उत्सव १९१२ सालीं सुरू झाल्यावर चवथ्या वर्षापासुन १९१६ सालापासुन ते आतांपर्यंत रामनवमीच्या उत्सवांत नारदीय पद्धतीनेच कीर्तन करीत आहेत. पण अलीकडे शके १८५६ (१९३४ सालीं) त्यांनीं एका कीर्तनांत शिरडी संस्थान कमिटीला कळविलें कीं वृद्धपणामुळें मी यापुढें उघड्या अंगानें कीर्तन करूं नये. अंगांत गरम बंडी घालून कीर्तन करावें, नाहींतर घामामुळें प्रकृतीस बाध होईल अशी डॉक्टरानीं सूचना दिलेला आहे. पूर्वीं कीर्तनास जातेवेळीं बाबांनी माझे अंगा-

वरील कपडे काढून घेतले, तसेच आतां त्यांचेकडून गरम कपडे (बाबाच्या अंगावरील शालीची बंडी) मिळाल्यास ती घालून मी कीर्तन करीन, नाहींतर बाबांच्या आज्ञेनुसार आतांपर्यंत उघड्यानेंच कीर्तन करीत आलों तसें करीत जाईन. या त्यांचे विनंति प्रमाणें त्यांना संस्थान कमीटीनें हिरव्या शालीच्या दोन बंड्या करून दिल्या (श्री साईलीला वर्ष ११ अंक १)

चोळकरांचा बिनसाखरी चहा

आणि

बाबानी या चहाची केलेली चहा

आतां दासगणूच्या कीर्तनाचा नमुना कसा असे आणि त्याचा श्रोत्यांवर काय परिणाम होत असे आणि त्यांना काय अनुभव येत असे याचा एक नमुना किंवा मासला आपण येथें पाहूं.

कोणत्याहि कीर्तन प्रसंगीं श्रोतृसमाज कसा असतो आणि त्यांची आवड-निवड कशी असते हें बहुत लोकांस माहीत आहेच. कोणाला हरिदासबुवाची व्युत्पत्ति आवडते, तर कोणाला त्यांचे हावभाव, कोणाला त्यांचे प्रेमानें नाचणें, कोणाला कीर्तनांतील पूर्वरंग (वेदांत निरुपण) तर कोणाला उत्तररंग (आख्यान किंवा कथा) आवडतो, पुष्कळांना त्यांच्या नकला आवडतात. ' ऐसे श्रोते बहुत असती । परि श्रवणें श्रद्धा भक्ति ॥ जोडे ईश्वर वा संत चरणीं प्रीति । ही श्रोतृस्थिति दुर्मिळ ॥ (श्री साई सच्चरित्र १५-४२). एकदां ठाण्याच्या लोकांनीं कोपिनेश्वर मंदिरांत दासगणूचें कीर्तन करविलें. नेहमीप्रमाणें ते कीर्तन 'सुश्राव्य' झालें. त्या प्रसंगीं ठाण्याच्या सिव्हिल कोर्टांतील चोळकर नांवाचा एक गरीब उमेदवार उपस्थित होता. त्या कीर्तनांतील श्रीसाईबाबांचें महिमान ऐकून तो अत्यंत गहिंवरला. '' आधीच चोळकर श्रद्धाळू । आला साई प्रेमाचा उमाळू ॥ मनांत म्हणतो बाबा कृपाळू करा सांभाळू दीनाचा ॥ (श्रीसाईसच्चरित १५-४५) '' कोणी देवाला अनेक तऱ्हेचे नवस करितात. आपली कामना पूर्ण झाल्यास इच्छा भोजन किंवा सहस्र भोजन घालूं, ब्राम्हणसंतर्पण करूं शतगोदान करूं किंवा अमुक रुपये (पांचशे रुपये देऊ असा एका मित्रानें साई बाबाला केलेला मी प्रत्यक्ष ऐकिलेला आहे) देऊं असे लोक नवस करित असतात. पण चोळकर आमच्या सारखा निर्धन, त्याचा गरी-

बीना संसार, परीक्षा पास झाल्यास नोकरी कायम होणार अशी त्यांची स्थिती होती तेव्हां त्यानें आम्हां गरीब लोकांसारखाच बाबावर सर्व भार घालून असा नवस केला

"झालों कृपेनें पास जर । होईन आपले पायीं सादर ॥
वाटीन नांवानें खडीसाखर । हाच निर्धार पै माझा ॥

[श्री साईसच्चरित, १५५२]"

पुढें लौकरच देव (बाबा) त्याच्या नवसाला पावला. चोळकराची परीक्षा पास झाली आणि त्याला कायमची नोकरी लागली. पण पगार थोडा आणि कुटुंब खर्च फार अशी स्थिति असल्यामुळें शिरडीस जाऊन नवस फेडण्या इतकीं पुंजी त्याचेजवळ जमेना. असें म्हणतात कीं, नाणेंघाट [ठाणें जिल्ह्यांतील मुरबाड तालुक्यांतील एक दुर्गम घाट किंवा सह्याद्रीचा अफाट कडाहि ओलांडता येईल पण गरीबांना उंबरघाट (घराचा उंबरा) ओलांडितां येत नाहीं म्हणजे द्रव्याभावीं प्रवास करितां येत नाहीं. चोळकरांची स्थिति अशीच झाली. त्याला आपलें घर (गांव) सोडून शिरडीस जातां येईना. तेव्हा त्यानें काट-कसर करण्याचें ठरविलें आणि साखरेशिवाय चहा घेण्यास सुरवात केली. याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर खर्चाची रकम जमतांच चोळकर शिरडीस गेला आणि त्यानें आपला नवस फेडला. बाबाचे दर्शन घेऊन त्यांचे पुढें श्रीफळ ठेवून त्यानें लोटांगण घातलें आणि निर्मळ मन करून खडीसाखर बाटली आणि ' म्हणती आजी मनोरथ सकळ । झाले सफळ कीं माझे ? (५९). चोळकर जोगाचे पाहुणे होते, जोगही त्यावेळीं तेथें हाजर होते. ते उठले आणि पाहुणे (चोळकर) जावयास निघाले तेव्हां बाबा जोगास म्हणाले—

पाजी यास चहाचे प्याले । भले भरले या साखरेचे ॥६१ ॥

खुणेचीं अक्षरें पडतां कानीं । चोळकर चमत्कारले मनीं ॥ आनंदाश्रू आले नयनीं । माथा चरणीं ठेविला ॥ चहा नाहीं बाबास ठावा । ये क्षणींच कां आठवावा ॥ चोळकरांचा विश्वास पटावा । ठसा उमटावा भक्तीचा ॥ श्रीसाईसच्चरित १५-६१, ६२, ६४) ! श्री बाबांनीं त्याला यायोगें असा इषारा दिला कीं, तुझी वाचादत्त (नवसाची) शर्करा मला पोंचली, तुझा त्यागाचा नियमही पुरा झाला, दीर्घ सूत्रतेचें (नवस लवकर न फेडणेचे कारण) प्रायश्चित [साखरे शिवाय चहा] तूं जरी गुप्त ठेविलें होतेस तरी तें सर्व मला

कळलें. तुम्ही कोणी कुठेंही असाना माझ्या पुढें तुम्ही भावानें पसा पसरतांच मी तुमच्या हृदयीं अंतर्यामी आहे. बाबाचे हें सर्वसाक्षित्व न अंतर्ज्ञान खरोखर अलौकिक होय. यांत शंका नाहीं.

दासगणू महाराजाचें अनुभव कथन

(दासगणू महाराज हे अद्याप श्रीकृपेनें हयात आहेत)

जून १९३६, पुणें.

दास गणू महाराज,

ऊर्फ गणपतराव दत्तात्रेय सहस्रबुद्धे

ब्राह्मण कीर्तनकार वय अजमासें ७८ (आतां ८३)

राहणार नांदेड (निजाम स्टेट).

यांचें कथन असें कीं—

मी श्री साईबाबा यांना बऱ्याच वर्षांपासून ओळखतों. त्यांची कांहीं हकीकत मी माझ्या ग्रंथांत [१] भक्तिसारामृत अध्याय २६, ६५, ६६ व ६७ (१९२५); [२] भक्तलीलामृत अ० ३१ (१९०६) व अ० ३२ व ३३; [३] संतकथामृत, अ० ५७ यापकीं दुसऱ्या ग्रंथाचा अध्याय ३१ आणि तिसऱ्या ग्रंथाचा अध्याय ५७ हे बाबाच्या हयातींतच प्रसिद्ध झाले होते.

बाबांच्या चरित्रांतील कांहीं गोष्टी त्यांच्या मुखांतूनच आल्या आहेत, पण त्या फार थोड्या. शिवाय माझा बाबांबरोबर फार काळ गेला नाहीं. माझी त्यांची क्वचितच भेट होई. शिरडीस असतांना बाबा मला फार वेळ मशिदींत राहणेस देत नसत. ते मला विठोबाचें देवालयांत जाणेस सांगत. तेथें मी राहून संतचरित्रें लिहीत असे. वर नमूद केलेले ग्रंथ लिहीत असें आणि विष्णुसहस्रनामाचा जप करीत असें. वर नमूद केलेले ग्रन्थ लिहिण्याचेपूर्वी बाबाविषयीं मी कांहीं चौकशी केली होती आणि कांहीं गोष्टी मला स्वतः प्रत्यक्ष माहीत होत्या. मी पोलीस खात्यांत हवालदाराच्या जागेवर होतों. तरी वाङ्मयाकडे व नाटकाकडे माझा विशेष कल होता. मला तमाशाचा फार नाद असून मी त्यांत भाग घेत असे. लावण्या व इतर छंदांत कविता तात्काळ स्फुर्तीनें करीत असे. मी नोकरींत असतांना आणि नानासाहेब कलेक्टरचे चिटणीस अगर डेप्युटी कलेक्टर असतांना त्यांनी मला साईबाबाकडे नेले. अगदीं प्रथमपासूनच

बाबानीं माझें भविष्य जाणलें, आणि माझी नोकरी, माझे छंद व मार्ग यांपासून परावृत्त करून माझें रक्षण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. माझ्या समक्ष त्यांनीं नानासाहेबांना सांगितलें कीं, '**या मनुष्यास तमाशाचा छंद आणि आपल्या नोकरीचा नाद आहे. त्यानें हें सर्व सोडुन द्यावें.**" त्यांनीं नानासाहेबांना व मलाहि तेंच सांगितलें.

पण मला माझे छंद [तमाशा वगैरे] व नोकरीही आवडत असत. हळुहळू मी तमाशांत भाग घेण्याचें बंद केलें. पण नोकरी मला सोडतां येईना. प्रत्येक वेळीं नोकरी सोडून देण्याचा उपदेश करण्यांत येई. 'तेव्हां मी पाहतों. विचार करतो' असे मी उत्तर देई. तेव्हां बाबानीं सांगितलें कीं, नोकरी सोडण्याचें भाग पाडल्याशिवाय म्हणजे याचेवर कांहीं कठीण प्रसंग ओढल्याशिवाय हा कांहीं नोकरी सोडणार नाहीं. याप्रमाणें सतत दहा वर्षे मी नोकरी सोडून द्यावी म्हणून बाबांनी एक सारखा माझ्या मार्गे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष लकडा लाविला. पुढें माझेवर एकामागून एक असे कठीण प्रसंग कसेकसे येत गेले आणि त्या सर्वांतून शिक्षा अपमान, हाल इत्यादिकापासून बाबाच्या कृपेनें माझी सुटका कशी झाली आणि शेवटीं १९०३ सालीं मला नोकरी कशी सोडावी लागली हें मी सांगणार आहें.

बाबाची साक्ष

बाबाची एकदां साक्ष झाली–त्यावेळीं बाबाच्या पूर्वाश्रमांतील कांहीं गोष्टी उघडकीस आल्या, त्याविषयीं मी प्रथम सांगतों. धुळें येथें तहसीलदार मॅजिस्ट्रेच्या कोर्टांत एका इसमावर चोरीच्या आरोपावरून कज्जा चालला होता. त्या आरोपीनें शिरडीच्या सांईबाबानें मला हें जवाहीर [चोरीचा माल] दिलेलें आहे असें सांगून बाबांची साक्ष काढली. त्याप्रमाणें बाबांना समन्स आलें. बाबानें तें घेण्याचें नाकारलें. इतकेंच नव्हे तर तें धुनींत(आगींत)फेंकून दिलें. तेव्हां बाबांवर समन्स लागू झालें आहे असा बेलिफाकडून रिपोर्ट गेला. पण बाबा कांहीं धुळ्यास गेले नाहींत. त्यावर धुळें कोर्टानें बाबावर वारंट काढलें. कोदरगांवचा चीफ कॉन्स्टेबल गणपत रामजी तें वारंट घेऊन आला आणि त्यांतील मजकूर बाबास सांगून माझेबरोबर धुळ्यास चला अशी विनंति करूं लागला. बाबाला पकडून नेण्याचें त्याला कांहीं धैर्य होईना. बाबा त्याला कांहीं दाद देईनात. ते रागावून शिव्या देऊं लागले. आणि तें वॉरंट मसणांत फेकून दे असें त्याला सांगूं लागले कॉन्स्टेबल घोटाळ्यांत पडला. त्यावेळीं मी तेथें होतों. अहमदनगरचे डेप्युटी कलेक्टर बाबाचे भक्त नाना

साहेब चांदोरकर यांचा या कामी सल्ला घ्यावा असें मी त्याला सांगितलें त्याप्रमाणें त्यांचा सल्ला विचारणेंत आल्यावर त्यांनी सांगितलें कीं, सांईबाबा व त्याचे भक्त यांना बाबानीं धुळ्यास साक्षीस जावें हें आवडत नसेल तर सांईबाबा हे एक अलौकिक पुरुष आहेत, त्यांचे अनेक भक्त त्यांना ईश्वर म्हणून मानतात, त्यांचेवर इतर सामान्य लोकांप्रमाणें कोर्टाची प्रोसेस (समन्स वॉरंट वगैरे) लागूं करणें हें गैर व अनिष्ट होईल, याकरितां त्यांची साक्ष शिरडीसच कमिशनवर व्हावी असा एक महाझर [Mahazar] विशेष अर्ज तयार करून त्यावर पुष्कळ लोकांच्या सह्या घेऊन धुळ्यास पाठवावा. त्याप्रमाणें अर्ज पाठविणेंत आला. तेव्हां धुळ्याचे कोर्टानी शिरडीस एक कमिशनर पाठविले. एक नाना जोशी नांवाचे फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट, असिस्टंट कलेक्टर बाबाची साक्ष घेणेस शिरडीस आले. ते येण्यापूर्वी तीन तास बाबानी एक टेबल व कांहीं खुर्च्या मागवून मशिदींत एक हंगामी कोर्ट तयार केलें कमिशनर (नाना जोशी) आले आणि बाबाची साक्ष घेऊं लागले. ही अपूर्व व अलौकिक साक्ष येणेप्रमाणें:--

कमिशनर-आपलें नांव काय ?

बाबा-मला सांईबाबा म्हणतात

क.-आपल्या वडीलाचें नांव ?

बा.-सांईबाबाच

क०—आपल्या गुरूचें नांव ?

बा०—वेंकुसा (वेंकुशहा).

क०—आपला पंथ किंवा धर्म ?

बा०—कबीर.

क०—जात किंवा वंश ?

बा०—परवरदिगर (अल्ला किंवा ईश्वर).

क०—कृपा करून आपलें वय सांगा.

बा०—लाखों वर्षें

क०—आपण जें कांहीं सांगतां तें सत्य आहे असें आपण शपथपूर्वक प्रतिज्ञेवर सांगाल काय ?

बा०—सत्य.

क०—अमुक आरोपी आपणास माहीत आहे काय ?

बा०—होय. मी त्याला आणि प्रत्येकाला जाणतों.

क०—तो आरोपी सांगतो कीं तो आपला भक्त असून आपलेपाशीं राहत होता. हें खरें आहे काय ?

बा०—होय. मी प्रत्येकाबरोबर राहतों. सर्वजण माझेच आहेत.

क०— त्यानें सांगितल्याप्रमाणें आपण त्याला जवाहिर दिलें काय ?

बा०— होय, मी त्याला दिलें, तर तें आपलेपाशीं आले व आपलेपाशीं कसे राहिले ?

बा.-प्रत्येक वस्तु माझीच आहे.

क.-बाबा, त्याचेवर चोरीचा मोठा आरोप आहे. तो सांगतो कीं, चोरीचे जवाहीर आपण त्याला दिले.

बा.-हें सर्व तुम्ही काय मांडलें आहे ? या सर्वांचा माझेशीं काय संबंध आहे ?

अशा उत्तरांनी कमिशनर थक्क झाले, थकले. पुढें काय लिहून घ्यावें हें त्यांना सुचेना. बाबा प्रत्येक प्रश्नाला होय म्हणून उत्तर देऊं लागले. तेव्हां अशी एक जोड तोड सुचविणेंत आली कीं, शिरडी ग्रामाची डायरी मागवावी कारण या डायरींत बाहेरचा कोण मनुष्य आला व तो किती दिवस गावांत राहिला याची नोंद असते. चोरी झाली त्या सुमारास आरोपी शिरडींत आला किंवा होता हें त्या डायरीवरून कळून येईल आणि त्यावेळीं त्याचे नांव त्या डायरींत नसेल तर ती गोष्ट नमूद करून ठेवावी. त्याप्रमाणें ती ग्राम डायरी आणविली आणि ती पहातां आरोपी किंवा तत्सम कोणीहि शिरडी गांवांत आला नाहीं असें आढळून आलें. बाबा तर शिरडी किंवा त्या गांवचा आसपास भाग सोडून बाहेर कधीं जात नसत हें सर्व विश्रुत होते. तेव्हां कमिशनरनी बाबाला प्रश्न केला कीं, चोरीच्या वेळीं आरोपी शिरडींत बाबापाशीं नव्हता. आणि बाबानी त्याला जवाहीर दिलें नाहीं. बाबानी सांगितलें कीं, होय. तसेंच ! बाबाचे हेंच शेवटचें उत्तर. झालें. बाबाची साक्ष संपली, सही करणेस किंवा अंगठा लावणेस त्याना सांगितले नाहीं. कमिशनवर झालेला जबाब धुळयास पाठविणेंत आला आणि आरोपीवर गुन्हा शाबीत होऊन त्याला शिक्षा झाली.

बाबाचें वय किती होतें हें ठरवितां येत नाहीं. तसेंच त्यांची जात, त्यांचे आई

बाप या विषयींही कांहीं नक्की सांगतां येत नाहीं. ४० वर्षांपूर्वी अजमासें ६५ अथवा ७० वर्षें वयाची शिरडीची एक वृद्ध बाई साळुबाई शेलके मला भेटली होती. तिनें मला सांगितलें कीं, ८ किंवा ९ व्या वर्षीं जेव्हां तिचें लग्न झालें तेव्हां बाबा शिरडीस आले आणि त्यावेळीं ते, आतां (१८९५) जसें ४०-५० वर्षांचे दिसले तसे दिसत होते. दुसरी एक वृद्ध बाई साईबाई म्हणाली, बाबा लहान मुलाप्रमाणें दिसत होते. तेव्हां ते शिरडीस आले. यावरून बाबाचे वय त्यांचे समाधीच्या वेळीं शंभरावर असावें असें वाटतें. आपलें वय किती हें किंवा पुर्वाश्रमीची विशेष माहिती विचारणेस कोणाची छाती होत नसे. तेव्हां याविषयीं नक्की असें कांहीं सांगतां येत नाहीं.

पण केव्हां केव्हां बाबा स्वतःच आपली पूर्वीची हकीकत सांगत असत. आपल्या गुरुविषयीं बाबांनीं पुष्कळदां सांगितलें कीं, (संत कथामृत ५७-२४ पहावी) व्यंकुशहा हे आपले गुरू होते आणि त्यांच्याच कृपेनें आपले हे हल्लींचें पद (स्थिति) प्राप्त झालें आहे.

त्यांचेविषयीं पुष्कळ गोष्टी अतर्क्य व गूढ असत. त्यांचे कांहीं चमत्कार मी स्वतः पाहिले आहेत व कांहीं दुसऱ्याकडून ऐकिलेले आहेत.

बाबांनीं मशिदीतील पणत्या तेलाऐवजीं पाणी घालून (किंवा पाण्याचें तेल करून) सबंध रात्रभर पेटत ठेविल्या ही गोष्ट प्रत्यक्ष पाहिलेल्या खेडूतांनीं मला सांगितली आहे. त्या दिवशीं बाबाला तेल देण्यास ज्यांनीं नकार दिला त्यांपैकीं प्रेमचंद मारवाडी हे एक होते.

मशीदींत, छपरास फाटक्या चिंध्यांनीं टांगलेल्या एक वीत रुंद, चार हात लांब अशा ज्या फळीवर बाबा निजत असत ती फळी मी स्वतः पाहिली आहे. जमिनीपासून सात आठ फूट उंच वर, व आढ्यापासून हात दीड हात खालीं टांगलेल्या फळीवर ते कसे चढत व उतरत असत हें एक आश्चर्यच होय. त्या फळीवर चार पणत्या हि पेटलेल्या असत. बाबा तेथें कसे चढतात व तेथून कसे उतरतात व फळी त्यांचा भार कसा सहन करिते हें पाहणेंचा पुष्कळांनीं प्रयत्न केला पण यांत कोणालाहि यश आलें नाहीं. भक्तलीलामृत अ. ३१. ओ. १२२ ते १४२ यांत जी

नारायण कृष्ण पेणशे यांची हकीकत दिलेली आहे ती मी सदर पेणशांकडूनच ऐकिलेली आहे.

बाबासमोर भक्तलीलामृत (अध्याय ३१, ३२, ३३) हा ग्रंथ पोथीसारखा वाचून दाखविणेंत आला. तेव्हां नानासाहेब चांदोरकरानी सदरहू ग्रंथ बाबाच्या हातीं दिल्याबरोबर बाबा उद्गारले कीं, हा ग्रंथ ठीक आहे.

मुसलमानाप्रमाणें पांच तर सोडून द्या बाबा एकदां सुद्धां नमाज पढत नसत. फतिआ म्हणावयाचा असला तर तो कोणाकडून तरी म्हणवून घेत, केव्हां केव्हां ते स्वतःहि म्हणत आणि कुराणांतील भागही म्हणत असत.

बाबानी नानासाहेब चांदोरकराना जो कांहीं उपदेश सांगितला तो त्यानी मला सांगितला. त्याला मी नीट नेटकें रूप देऊन भक्तलीलामृत [अ. ३३] प्रसिद्ध केला. त्यांतील मुख्य भाग नानासाहेबानीच मला दिला (सांगितला) आहे. बाबानीं पुष्कळदां माझें समक्ष अद्वैताचें निरुपण केलें आहे. 'अहं ब्रम्हाऽसि, तत्त्वमसि, सर्वं खल्विदं ब्रम्ह' ही महावाक्यें बाबानीं पुष्कळदां उच्चारिलीं आहेत

बाबाना अवगत नाहीं असें कांहींच नाहीं

बाबा बहुधा जें कांहीं करीत असत त्याचा अर्थ किंवा बोध स्पष्ट असे याविषयीं एक उदाहरण देतों. कोपरगांवास वालेंबी मास्तर नांवाचा एक स्टेशन मास्तर होता. त्याची बाबावर श्रद्धा नव्हती. त्यानीं मला व इतर भक्तांना सांगितलें कीं, बाबा हा वेडापीर आहे, त्याचें तुम्हीं इतकें स्तोम कां माजवितां ? तथापि माझेबरोबर शिरडीस बाबाचें दर्शनास येण्यास मी त्याचें मन वळविलें.

आम्हीं जेव्हां बाबाच्या दर्शनास गेलों, तेव्हां ते बासनें–पात्रें धुवून तीं जमिनीवर 'मुख खालीं व तळ वर' अशीं ठेवीत होते. हें असें कां असें वालेंबी मास्तरानें विचारलें बाबा म्हणाले कीं, प्रत्येक पात्र जें माझेकडे येतें तें 'अधोमुख' म्हणजे 'अग्रहण' स्थितींत येतें.

इ. स. १८९८–९९ चे सुमारास काना भिल्ल नांवाचा एक डाकू (दरवडेखोर) अहमदनगर व बीड जिल्ह्यांत म्हणजे ब्रिटीश मुलखांत आणि संस्थानांत चोऱ्या करून धुमाकुळ घालीत होता एकसारखे तीन वर्षें पोलीस त्याच्या पाठीवर (शोध करीत) होते, पण त्यांना तो कांहीं सांपडेना. त्यावेळीं मी एक साधा हवलदार होतों. त्याची हालचाल पाहून रिपोर्ट करण्यासाठीं माझी व दुसऱ्या तिघा इसमांची स्पेशल गुप्त हेर

म्हणून नेमणुक झालेली होती काना भिल्ल फार धूर्त व लबाड होता आणि त्याचें गुप्त हेर खातें इतकें कांहीं तरबेज होतें कीं, त्यांनीं त्या तिघां इसमांना गांठून एकामागून एक असे ठार केले. माझे हातून फारसें काम झालें नव्हतें म्हणून मी कुचकामाचा व निरुपयोगी आहे आणि मी कसून प्रयत्न केला पाहिजे असा आमच्या इन्सपेक्टरसाहेबानीं रिपोर्ट केला. माझा त्यावेळीं रामदासी बाणा असे आणि लोणी बर्णी येथील राम मंदीरांत मी कीर्तन करीत असे. तेथील पाटील हा काना भिल्लाचा मित्र असून तेथें काना भिल्ल त्याला पुष्कळदां भेटावयास येत असे. काना भिल्लानी माझ्याविषयीं सर्व माहिती (माझे नांव बकल नं. ७२७, माझें स्टेशन वगैरे) मिळविली आणि एके दिवशीं तो मला गोळी घालून ठार मारण्यास आला. मीं राममंदिरांत गेलों आणि मला वांचीव अशी श्रीरामाची प्रार्थना केली. माझ्यावर आपली नजर आहे अशी मला ताकीद देऊन तो भिल्ल निघून गेला. त्याच्या साथीदारांनीं माझ्यावर पाळत ठेविल्यामुळें मला तो गांव सोडतां येईना. त्या खेड्यांतील मुलांकडून त्या भिल्लाचा कार्यक्रम व हालचाल यांविषयीं मी माहिती मिळविली व ती पोलिसांना कळविली. तो भिल्ल ज्या टेंकडींत छपून बसला होता त्या भोंवतीं पोलिसांनी गराडा घातला. पोलिसांची व त्याची गोळीबारानें लढाई जुंपली, कांहीं पोलिस मारले गेले व तो भिल्ल पसार झाला.

मला हृदयाचा विकार जडला आहे असें सर्टिफिकेट मिळाल्यामुळें गुप्त हेराच्या कामांतून माझी सुटका झाली. त्यानंतर लोणावर्णीच्या खेडूतांनीं त्या दरवडेखोराला आश्रय दिला म्हणून राळे मामलेदारासमोर खटला सुरू झाला. त्या गांवच्या पाटलानें मला वेळोवेळीं माहिती देऊन मला मदत केली अशी मी पाटलातर्फे साक्ष दिल्यामुळें तो दोषमुक्त झाला.

मी माझी हद्द सोडून एका क्षेत्राला गेलों आणि तेथून गोदावरी तीराला येऊन गोदेचें पाणी हातीं घेऊन बाबांची प्रार्थना करून असा नवस केला कीं, जर बाबाने माझा बचाव केला तर मी नोकरी सोडून देईन. नंतर त्या क्षेत्रीं कांहीं लुटालुटी मालासहित एक टोळी मला तेथें आढळली. तेव्हां तेथें जाण्याची मला एक सबब मिळाली. दैवी चमत्कारानेंच यांतून माझी सुटका झाली. तरी फौजदार व्हावें अशी माझी तीव्र महत्वाकांक्षा होतीच. याकरितां मी परिक्षेला बसून तींत पासहि झालों. पण फौजदारी मला मिळणार नाहीं असें बाबानीं मला सांगितलें.

माझी एका गांवीं बदली झाली आणि तेथें जातांना मला शिरडीवरून जावें लागलें. मी नोकरी चालू ठेविल्यामुळें तें बाबाला आवडणार नाहीं असें वाटून मी त्यांचे दर्शन घेणार नव्हतों त्यामुळें गांवांत मशिदीच्या रस्त्यानें न जातां मी थेट शिरडी-गांवाबाहेरच्या मोठ्या रस्त्यानें चाललों. पण योगायोग असा कीं, मी लेंडीपाशी मोठ्या रस्त्यावर येतांच, बाबा माझे समोर दत्त म्हणून उभे राहिले. तेव्हां मी घोड्यावरून उतरून त्यांचे चरणावर मस्तक ठेविलें. मशिदीकडे येण्यास त्यांनीं मला सांगितलें. तेथें गेल्यावर बाबानीं मला विचारलें-गणू, गोदेचें पाणी हातांत घेऊन कोणी नवस केला? मी उत्तर दिलें, त्यांत काय बिघडलें, मी खरोखरच नोकरीचा राजीनामा देणार आहें. त्यावर बाबा म्हणाले, जरा थांब, सर्व कांहीं सुराळितपणें चालल्यामुळें तूं कांहीं आमचें ऐकणार नाहींस.

यानंतर माझा कांहीं अपराध नसतां मी दुसऱ्या एका संकटांत सांपडलों. एका शिक्षा झालेल्या आरोपीच्या दंडाची ३२ रु. रकम वसूल होऊन सरकारांत जमा करणेसाठीं माझे गांवीं पाठविणेंत आली. ती माझ्या पश्चात् माझ्या असिस्टंटने घेऊन दाबून टाकिली. पुढें त्या आरोपीची सुटका न झाल्यामुळें, त्याविषयीं तकरार होऊन चौकशी सुरु झाली. मला सस्पेंड करण्यांत आलें. हें प्रकरण माझेवर शेकणार आणि मला शिक्षा होणार असें दिसूं लागलें. माझी यांतून सुटका झाली तर मी नोकरी सोडीन असा मी पुनः नवस केला आणि शेवटीं १९०३ सालीं मी नोकरीचा राजीनामा दिला.

बी. व्ही. स्वार, समर्थ फोटो आर्ट स्टुडिओ

फोटोचे दरः—

	किंमत रु.		किं, रु.
(१) हाफ पोस्टकार्ड साईज	०–४–०	(४) कॅबिनेट साईज माऊंटेड	०–१२–०
(२) पोस्ट कार्डस्	०–६–०	(५) फुलसाईज माऊंटेड	१– ४–०
(३) कार्डसाइज माऊंटेड	०–८–०	(६) एन्लार्जमेंट	६– ०–०

एडिटर, श्रीसाईलीला,
टिळक जुबिली ट्रस्ट बिल्डिंग नं. २
गोखले रोड (नॉर्थ) दादर मुंबई.
यांजकडे मिळतील.

गलेफाचें माप

ज्या भक्तांना गलेफ पाठवावयाचा असेल त्यांनीं वरील मापांत पाठवावा.

भक्तांकरितां खुलासा

श्रीसाईबाबा

श्री साईबाबांचे शिरडींत दर्शनास येणारे भक्तांकडून संस्थानचे ऑ. चि. यांस वेळोंवेळीं विचारणेंत येणारे प्रश्नांचें खुलासे तमाम भक्तवृंदाचे माहितीकरितां पुढील प्रमाणें करणेंत येत आहेत. जादा खुलासा पाहिजे असलेस भक्तानीं कमिटीकडे लेखी अर्ज करून घ्यावा.

(१) **बाबांच्या गाई.**

या संस्थानने ठेविलेल्या नसून संस्थानचे बागेची ऑनररी व्यवस्था पाहणारे श्रीयुत सगुण मेरू नाईक यानीं ठेविलेल्या असून त्या प्रीत्यर्थ ते आले गेले भक्तांकडे गोग्रासमदत मागतातः करितां संस्थानचे मार्फत अशाबाबतं पावत्या देतां येत नाहींत. या गायांचे दुध संस्थानकडे विनामोबदला दिले जात नाहीं. गायांचे पोषणाकडे संस्थानचे बागेंतील चारा वगैरेचाच उपयोग होतो ही गोष्ट खरी आहे. याचा खुलासा कमिटीकडून करून घ्यावा.

(२) बागेंतील फुलें बाबांचे पुजेस रोज उपयोगांत येतात व फळें बागेचे आ. व्यवस्थापक आपले मर्जीनुरूप आरतीचेवेळीं प्रसादाकरितां म्हणून आणून देतात.

(३) बागे प्रीत्यर्थ पूर्वी एक नोकर होता त्या ऐवजीं हल्लीं दोन कायमचे नोकर दिलेले आहेत व बागेस लागणारा सर्व खर्च संस्थानकडूनच होतो.

(४) भक्तांकडून फुल व फळझाडे बागेंत लावणेस संस्थानांत दिल्यास अगर परस्पर दिल्यास त्यांची लागवड हे ऑ. व्यवस्थापक नीट रितीनें करितात.

(५) बागेंतील फळें, आलेले भक्तांस प्रसाद म्हणून अगर विकत म्हणून जी या व्यवस्थापकांकडून मिळतात त्याचा खुलासा परस्पर कमिटीकडे लेखी करावा.

मु. शिरडी,
ता. ७ मार्च १९४२

श्री. ना. खारकर
ऑ. चि. शिरडी संस्थान.

श्रीशंकर.

श्री सद्गुरू साईबाबा

श्री. सच्चिदानंद सद्गुरू आधुनिक संतचूडामणी श्री साईबाबा महाराज संस्थान शिर्डी ता. कोपरगांव, जि. अहमदनगर यांचा सालाबादप्रमाणें श्रीरामजयंती उत्सव चैत्र शु॥ ९ शके १८६४ गुरुवार ता. २६ मार्च १९४२ रोजीं श्रीक्षेत्र शिर्डी येथें महाराजांच्या मंदिरांत होणार आहे. तरी या समयीं आपण कृपा करून आपल्या कुटुंबांतील बालगोपालांसह व मित्रमंडळींसह श्रींच्या तीर्थप्रसादास अवश्य यावें अशी नम्र विनंती आहे.

उत्सवाचा कार्यक्रम

ता. २५ मार्च चैत्र शु. ८ बुधवार:—उत्सव मूर्तीची स्थापना व दुपारीं कीर्तन.

ता २६ मार्च चैत्र शु. ९ गुरूवारः-काबडी मिरवणूक, श्रींचे समाधीस गंगास्नान, जन्मोत्सव कीर्तन, भोजनसमारंभ, काठ्या, संदल व चावडी यांच्या मिरवणुकी व दारूकाम.

ता. २७ ,, ,, शु. १० शुक्रवारः- कुस्त्या, कीर्तन व रथाची मिरवणूक

ता. २८ ,, ,, शु. ११ शनिवारः-कीर्तन व रात्रीं श्रींची पालखी.

ता. २९ मार्च चैत्र शु० १२ रविवारः- गोपालकाला व तीर्थप्रसाद

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी मार्फत.

शिर्डी,
ता. २६ फेब्रुवारी १९४२

आपला नम्र,
सकल सन्तचरणरज,
दासगणू

सूचनाः-जरुरीप्रमाणें कार्यक्रमांत फेरफार करणेंत येईल. वर्गण्या संस्थानचे ऑ. खजिनदार श्री. रा. वा. चैसास लो. टि. जुबिली ट्रस्ट बिल्डिंग नं. २, गोखले रोड (नॉर्थ), दादर, मुंबई नं. १४ अगर ऑ. चिटणीस, श्री. ना. खारकर, ३७ चरईरोड, ठाणें. अगर शिरडी येथें, दासगणू यांजकडे पाठवाव्या.

PROTEST

With reference to announcements by All India Sai Samaj in the December issue of "Sai Sudha" under the heading, Shirdi Notes, that Madrasi and South Indian devotees can get things done at Shirdi through one Adinarayan C/o Sai Sansthan, Shirdi. The Sansthan notifies for general information that there is no such arrangement recognised by the Sansthan and nothing can be done or arranged for through any other agency than that of the Sansthan.

Further that the statements contained in the "News & Notes" column of the said issue as to gifts of books by the Samaj to Sai Sansthan and that the sale proceeds of books published by the Samaj also go to Sai Sansthan are instances of suppression of truth and suggestion of falsehood. In view, however, of the Samaj's open announcement that the Samaj does not represent the Sai Sansthan. The Sansthan declares that they are not responsible for the activities, propaganda &c, of the Samaj as also of such similar individually managed schemes like the "Durgish Shirdi Cottage" &c.

It is a fact that funds are badly needed for provision in the Sansthan of quarters for visitors and it is hoped that the piety of all Sai Divotees will induce them to help the Sansthan direct in providing accommo-

dation which work has already been undertaken by the Sansthan.

Shirdi
Via-Rahata P. O.
5th February. 1942.

By order,
S. N. KHARKAR.
Hony. Secy. Shirdi Sansthan Committee.

ANNOUNCEMENT.

Shri Ramajayanti Utsava for the shake year 1864 of Shri Sadguru Sai Baba will as usual be celebrated at His Shrine at Shirdi, Taluka Kopergaon, Dt. Ahmednagar. All devotees of Sai Baba are invited to attend and partake in the celebrations which will commence from Wednesday the 25th and terminate on Sunday the 29th of March 1942.

Contributions should be sent either to the Sansthan's Hony. Treasurer (Mr. R. V. Ghaisas, Tilak Jubilee Trust Bldg No. 2, Gokhale Road, North) Dadar, Bombay 14. or to the Hony. Secy. Mr. S. N. Kharkar, 37, Charai Road, Thana or Dasganu at Shirdi P. O. Rahata.)

By order of,
Shri Sai Baba Shirdi Sansthan Committee.

SHIRDI
20th February
1942

Yours humbly servant
of all saints,
DASGANU.

Now the Sansthan Rule Book (only in English) is available-Price Annas 4 including postage &c.

श्रीसाईनाथ प्रसन्न.

शिर्डी वृत्त

जानेवारी १९४२

या महिन्यांत मुंबई, पुणें, नगर, मद्रास, शिकंदराबाद, हैद्राबाद, ठाणें, बंगलूर वगैरे ठिकाणचे बरेच भक्त श्रींचे दर्शनास आले होते.

देणगी.

श्री. एस. बी. केशवय्या पेनाकोंडा (अनंतापूर) धोतरपान, श्री. व्ही. किसनराव इ. इंजिनीयर हैद्राबाद, गलेफ लाल सॅटीनचा व मोत्याची फित लावलेला, श्रीमती धारा वेंकटरमण, लेडी डॉक्टर ११६, लिंगचेट्टी स्ट्रीट; जी. टी. मद्रास, जरीची साडी, व श्री. रामचंद्र आत्माराम दोंदे, खार, केसरी शाल.

धर्मकृत्य.

भक्तांकडून नेहमींप्रमाणें अभिषेक, अर्चनें, नैवेद्य, वगैरे बरेच झाले.

कीर्तनें.

संस्थान गवई यांचीं ३ कीर्तनें झालीं

नवल विशेष.

श्रींचे लेंडी बागेंत पार बांधणेंची भूमिपूजा गुरुवार ता. १-१-४२ रोजीं संस्थानचे सन्माननीय ट्रस्टी श्री. रावसाहेब यशवंतराव गाळवणकर यांचे हस्तें झाला.

पाराचे बांधकाम लागलेंच सुरू होऊन पुरें झालें आहे. पार बराच उंच, विस्तृत व वर शाहबाद फरशीचा असा झाला आहे. पारावरील दीपगृह अथाप होणेंचें आहे. दिक्षीत वाड्यांतील मागील बाजूस आवारांत असलेलीं झाडें तोडून काढून व पडीत असलेल्या खोल्या मोडून काढून सर्व जागा साफ करून घेऊन

तेथें चार खोल्यांचे कामास सुरवात झाली असून पायाचें काम पुरें झालें आहे. या खोल्यांचें काम पुरें होतांच या आवारांत बिहीरीची सोयही होणार आहे.

ता. २०-१-४२ रोजीं श्रीचे मंदिरासमोर भव्य सभामंडपांत गांवचे लोकांनीं मांडव वगैरे देऊन मे. हुलंडसाहेब, रिक्रूटिंग ऑफिसर इलाखा मुंबई यांचे अध्यक्षतेखालीं सभा भरली होती. या सभेस सरकारी बडे बडे अधिकारी व नगर व कोपरगांव येथील कांहीं प्रतिष्ठित लोक हजर होते.

हवा पाणी उत्तम आहे.

श्रीधर ना. खारकर.

ऑ. चिटणीस.

शिरडी-कोठी वृत्तः—

जानेवारी १९४२

आले गेले भक्तांची व्यवस्था व १५० गरिबांस अन्नदान ६० गरिबांस कोरडा शिधा देणेंत आला. भक्तांचे १९ नैवेद्य १ तुपाचा अखंडदीप व ५ब्राह्मण सवाष्ण घालणेंत आले. दर गुरुवारी व शुक्रवारी खडीसाखर व फुटाणें यांचा प्रसाद करणेंत आला.

गो. चि. कुळकर्णी.

मॅनेजरः-शिरडी संस्थान.

फेब्रुवारी सन १९४२

चालू महिन्यांत मुंबई, पुणें, ठाणें, मद्रास, सिकंदराबाद करनूल, बल्लारी, बेझ. वाडा, बेंगलूर, नेल्लोर, वगैरे ठिकाणचे भक्त श्रींचे दर्शनास येऊन गेले.

श्री. मारुती नागुजी कागने मु. गुलवद जि. नाशीक यांजकडून साधे सुती तांबडे निशाण.

चालू महिन्यांत भक्तांचे नैवेद्य, अभिषेक अर्चन, वगैरे धर्मकृत्यें नेहमीं प्रमाणें झाली.

या महिन्यांत ४ कीर्तनें. श्रीदासनवमी, महाशिवरात्र, माघ व॥ ११ व फाल्गुन शु. ११

महाशिवरात्रीचे दिवशीं सकाळ दुपार संध्याकाळ व मध्यानरात्र अशा चार

वेळीं एक लघुरुद्र व इतर अभिषेक श्रींचे समाधी व निंबवृक्ष पादुका या दोन ठिकाणीं झालें. महाशिवरात्रीचे श्रींचे पालखीची मिरवणूक रात्रौ झाली.

अहमदनगरचे गवई श्री. सोनवणे यांचे श्रींचे मंदिरांत एक तासभर गायन झालें.

लेडी बागेंतील पाराचे काम पुरें झालें असोन त्यावरील दीपगृह फक्त होणेचे राहिले आहे.

दिक्षीत वाड्यांत ४ नवीन खोल्या बांधणेचे कामास सुरवात झाली आहे. हें काम श्रीरामनवमीला पुरें होईल असा अंदाज आहे.

शिर्डी येथील हवा पाणी उत्तम आहे.

गो. चि. कुळकर्णी
मॅनेजर शि. सं.